# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै, २०२६
पृष्ठे ६८    किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक सातवा




## १ जुलै
# राष्ट्रीय डॉक्टर दिन

## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२६पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२६मध्ये केली जाईल. १२ जानेवारी, २०२७ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦ जुलै २०२६ ♦ वर्ष सव्विसावे ♦ अंक सातवा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाऊस


## – अनुक्रमणिका –



| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| प्रकाशनांची मांदियाळी | १० |
| विशेष लेख | १४ |
| पुरस्कार | १८ |
| नियुक्ती | २० |
| श्रद्धांजली | २१ |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| मोहरलेला चंद्र | २२ |
| बनगरवाडी | ३४ |
| धर्म... कबीरांच्या मनातला | ४२ |
| अकबर ऑफ हिंदुस्थान | ५० |
| अ वॉन्टेड मॅन | ५६ |
| दिनविशेष | ६१ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



# संपादकीय

## आरोग्यम् परमम् भाग्यम्..!

**आरोग्यम् परमम् भाग्यम् स्वास्थ्यम् सर्वार्थसाधनम्।**
**आरोग्यम् मूलमुत्तमम् जीवनस्य सुखाय च॥**

*: निरोगी असणं हे सर्वांत मोठं भाग्य आहे. जीवनातील सर्व ध्येयं साध्य करण्यासाठी आरोग्य आवश्यकच आहे. आरोग्य हा जीवनातील प्रगतीचा पाया आहे. फक्त निरोगी व्यक्तीच जीवनातील सुखांचा खऱ्या अर्थानं आनंद घेऊ शकते.*

श्लोकाचा अर्थ समजल्यावर तो जरा जरा पटतोय ना? वाचकहो, लहानपणी आपल्याला शिकवलं जायचं की, सकाळी उठल्यावर किमान पाच तरी सूर्यनमस्कार घालावेत, दोरीवरच्या उड्या माराव्यात, भरपूर सायकल चालवावी, खूप मैदानी खेळ खेळावेत, वाकून कामं करावीत आणि संध्याकाळ होताच देवासमोर थोडा वेळ शांत बसून श्वासावर लक्ष केंद्रित करावं. परंतु, हे त्या अजाण वयात बंधन वाटायचं - नको वाटायचं. आपण सर्वही याच भावनांतून गेलेलो आहोत. 'काय रोजची कटकट?'



असं वाटून अनेकदा टाळम्टाळ करून आपण वयाबरोबर पुढे जात राहतो. वय वर्षं ३५चा उंबरठा ओलांडला आणि निरोगी आरोग्याची दुर्लक्षित फळी डगमगायला लागल्यावर आपण जागे होतो. तरीही उठता-बसता गुडघे वाजणं, शरीरातील ताकद अधेमधे कमी होणं. उशिरा झालेल्या बाळंतपणानंतर वजन कमी न होणं, बद्धकोष्ठता वाढणं, अधेमधे अन्नावरील वासना उडणं, सतत पित्त होणं यांसारख्या कमी ते जास्त गंभीर आजारांशी सामना करावाच लागतो. त्यामुळे यात पैसा मात्र प्रमाणाबाहेर खर्च होतो.

मग तो खर्च वाचवण्यासाठी घाईघाईने जीम जॉइन करून हजारोंमध्ये पुन्हा पैसे खर्च करतो. काहींना जीमला जाणं जमतं आणि तो त्यांच्या आयुष्याचा भाग होऊन जातो; परंतु काहींचे नवलाईचे नऊ दिवस दोन दिवसांतच संपतात आणि नंतर मात्र आलं आजारपण - घे गोळ्या अशी गत होते. मग खिसा कधी रिकामा होतो तेसुद्धा कळत नाही. गंभीर समस्येवर वैद्यकीय उपचार घेणं - दररोज संतुलित आणि पोषक आहार घेणं - झोपेचं नियोजन करणं आणि न चुकता कसरत करणं; यांची सांगड घातली तर मात्र वयाच्या शंभरीपर्यंत मनुष्य निरोगी आणि तंदुरुस्त राहू शकतो. यावर उपाय सांगण्यासाठी आजच्या काळात युट्यूब व्हिडीओजपासून चॅट-जीपीटीवरील डाएट प्लॅन्स तर उपलब्ध आहेत; त्याचबरोबर असंख्य डिग्री असलेले आणि नसलेले डॉक्टर्स सोशल मीडियावरही उपलब्ध आहेत. तसेच साध्या किरकोळ समस्या घरगुती उपायांनी घरच्या घरी सोडवता येऊ शकतात असे मानणारेही आहेत. पण, हे घरगुती उपाय 'डॉक्टरांना' पर्याय नक्कीच नसतात हेही ध्यानात घेणं गरजेचं आहे. तुमचं शरीर तुमच्या फॅमिली डॉक्टरांना आणि तुम्हाला स्वतःलाच पूर्णपणे माहीत असतं. मग जेव्हा तुम्ही सोशल मीडियाच्या प्रभावाखाली स्वतःवर काम करायचं ठरवता तेव्हा त्यात धोकाही असू शकतो.

आपलं शरीर आणि समोर येणारी माहिती पडताळून पाहणं आवश्यक असतं. सध्या भेसळयुक्त पदार्थांचा रोजच्या आहारात होणारा समावेश आणि बऱ्यापैकी एकाजागी बसून होणारी कामं यामुळे शरीरात निर्माण होणाऱ्या समस्या या शारीरिक आणि मानसिक दोन्ही प्रकारच्या असतात. अशा वेळेस कधीकधी औषधांव्यतिरिक्त या समस्यांवर घरगुती उपाय कोणते असतील, असा प्रश्न मनात येतो. याचं उत्तर मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'चला जाणून घेऊ या' या शीर्षकांतर्गत असलेल्या पुस्तकांमधून काही अंशी मिळतं. 'अस्थमा', 'उच्च रक्तदाब', 'बद्धकोष्ठता', 'गुडघेदुखी', 'तंदुरुस्ती', 'मंत्रसामर्थ्य'

आणि ‘मनोविकास’ यांसारखी मनाला सकारात्मक ऊर्जा देणारी, व्यायाम व आयुर्वेदातील घरगुती उपाय सुचवणारी आणि शरीराची काळजी कशी घ्यायची याबाबत योग्य मार्गदर्शन करणारी पॉकेट बुक्स वाचकांसाठी उपलब्ध आहेत.

जसजसं वय वाढतं तसतसं शरीर कमालीचं बदलू लागतं. कधीकधी डॉक्टरांकडे न जाता मेडिकलमधूनच औषधं आणून आजार बरा करण्याकडे कल असतो. फार्मसीवालासुद्धा काही वेळेस औषधं सुचवतो आणि आपणही त्याच्यावर विश्वास ठेवून ती घेतो. परंतु, अशामुळे आपल्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो याकडे आपण दुर्लक्ष करतो. म्हणून अशा वेळेसही आमची काही पुस्तकं आपल्याला मार्ग दाखवू शकतात. ‘चाळिशीनंतरची वाटचाल’, ‘डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी’, ‘पाणी : एक अद्‌भुत उपचारपद्धती’, ‘आरोग्यासाठी योग’, ‘एकच पेला शिवाम्बूचा’ या पुस्तकांचं वाचन एकदा जरी केलंत तरी स्वतःच्या शरीराची काळजी कशी घ्यायची याचं ज्ञान मिळेल. अनेकदा डॉक्टरही सांगतात की, भरमसाठ गोळ्या घेऊन शरीर खिळखिळं करण्यापेक्षा रोज योग, प्राणायाम, सूर्यनमस्कार आणि त्याचबरोबर योग्य आहार घेतला तरी बरेच आजार दूर राहतील आणि शरीरातील रक्त प्रवाही राहील. परंतु, गंभीर समस्या असेल तर वेळ न घालवता डॉक्टरांकडे जाणंच योग्य. ते म्हणतात ना आहार हा जीवनातील खूप महत्त्वाचा घटक आहे :

**मिताहारी च यो नित्यम् सर्वदोषविवर्जितः।**
**सुखी भवति लोकेऽस्मिन् आरोग्यम् तस्य वर्धते।।**

*: जी व्यक्ती नेहमी माफक प्रमाणात (गरज आणि क्षमतेनुसार संतुलित आहार) घेते आणि खाण्यापिण्यातील दोष टाळते, ती या जगात सुखी राहते आणि तिच्या आरोग्यात सुधारणा होऊन ते चांगलं राहतं.*

योग्य वेळेस आहार करण्याने शहरातील चया-पचयाची क्रिया सुरळीत होते आणि अतिरिक्त चरबी किंवा फॅट्स वाढत नाहीत. आहाराच्या बाबतीतही सध्या इतके जण वेगवेगळ्या माध्यमांतून लिहीत-बोलत असतात की, कोणाचं ऐकावं आणि कोणाचं नाही याचा संभ्रम निर्माण होणं साहजिकच आहे. म्हणून ‘स्थूलतेला करा टाटा’, ‘सुडौल राहा’, ‘धन्वंतरी घरोघरी’ आणि ‘अन्नपुराण’ या आमच्या पुस्तकांतून संतुलित आहार कसा असावा आणि

रोजच्या आहाराचं स्वरूप कसं बदलावं याचं योग्य मार्गदर्शन होतं. आजार आणि मानसिक स्वास्थ्य यांचं खूप जुनं नातं आहे. म्हणजे बघा, फोनमध्ये आलेला एखादा मेसेज न वाचताच चुकून डिलिट झाला तरी काहींना बेचैन व्हायला होतं व त्यामुळे पोटदुखी - डोकेदुखी - घाबरायला होणं असंही घडतं. तसं घडल्यामुळे जे खाल्लंय ते नीट पचत नाही. किंवा याउलट खूप खाण्यानं कधीकधी पोट बिघडलं असेल तर कामात लक्ष लागत नाही - विसरल्यासारखं होतं. म्हणूनच आजार हे मानसिक स्वास्थ्य बिघडल्यामुळेही होतात असं बऱ्याचदा अनेकांचं म्हणणं पडतं. यासाठी 'तणावमुक्तीसाठी योगसाधना', 'उपचार तन मनाचे', 'स्वजाणिवेतून स्वास्थ्यप्राप्ती' आमची ही पुस्तकं नक्की वाचावीत अशी आहेत. यावरून एक मात्र नक्की लक्षात येतं की, 'वाचाल तर वाचाल' ही उक्ती वैद्यकीय उपचारांच्या बाबतीतही अगदी चपखल लागू होते.


आजच्या जीवनशैलीमुळे औषधांचं आपल्या घरात वाढतं साम्राज्य आहे. ते आटोक्यात आणायचं असेल किंवा सद्य: प्रमाणापेक्षा कमी करायचं असेल तर खालील श्लोकाचा अर्थ कायम लक्षात ठेवणं गरजेचं आहे.

**पुनर्वित्तम् पुनर्मित्रम् पुनर्भार्या पुनर्मही।**
**एतत् सर्वं पुनर्लभ्यम् न शरीरम् पुनः पुनः॥**

*: आयुष्यात धन, मित्र, पत्नी आणि भूमी (जमीन किंवा राज्य) यांचा पुन्हा लाभ होऊ शकतो. परंतु, हे मानवी शरीर एकदा नष्ट झालं किंवा बिघडलं, तर ते पुन्हा सहज प्राप्त होत नाही. त्यामुळे शरीराची काळजी घेणं अत्यंत आवश्यक आहे.*

म्हणूनच येत्या १ जुलैपासून म्हणजेच डॉक्टर दिनापासून आपण स्वतःच स्वतःच्या शरीराला योग्य तऱ्हेनं ओळखण्याचा प्रयत्न करू या. वरील पुस्तकांमधील साधेसुधे कानमंत्र आजमावून आपल्या शरीराचं आणि मनाचं आरोग्य सुधारण्याकडे आणि स्वतःचं शरीर निरोगी राखण्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊ या.

*पोषक खाऊ या... सुदृढ राहू या... रम्य विराजे माथ्यावरतीं*



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**


टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली,
वाचायला सोपी,
सोयीस्कर
– थेट तुमच्या
कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि
ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
स्वामी
रणजित देसाई
ebook
available on :
Google Play Books
amazonkindle
Get it on Apple Books

# प्रकाशनांची मांदियाळी

## नवीन बालकथासंग्रहाची वाचकांना भुरळ

**पुणे :** मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनात ६ जून, २०२६ रोजी 'हाटूमुटूचा चंद्र' या फारूक काझी लिखित पुस्तकाचं प्रकाशन प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांच्या हस्ते करण्यात आलं. 'हाटूमुटूचा चंद्र' हा कल्पनाशीलता आणि करुण भाव असलेला बालकथासंग्रह आहे. त्याचबरोबर माणदेश आणि माणदेशी भाषा यामुळे काझी यांच्या कथांमधून माडगूळकरांच्या कथाशैलीची आठवण होते. निसर्ग, लहान मुलांच्या मनातील निरागसता, गरीब-श्रीमंत याबाबतची बालमनाची जाणीव याचा अनुभव या कथांमधून येतो. या कार्यक्रमाच्या वेळी लेखक फारूक काझी यांनी कथालेखनामागची लेखकाची भावना काय असते, कथाबीज सापडल्यावर लेखक कथालेखन कसं करतो हे आपल्या मनोगतात व्यक्त केलं. बालकथेतील अद्भुतरस हरवत चाललाय अशी चर्चा होत असली, तरी तो काझी यांच्या कथेत अनुभवायला मिळतो; असं मत प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी व्यक्त केलं.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या शिक्षण सहसंचालक



मा. कमलादेवी आवटे यांनी फारूक काझी यांच्यातील प्रयोगशील शिक्षक आणि सर्जनशील लेखक यांबाबत गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अक्षय वाटवे यांनी केलं. या वेळी प्रकाशक अखिल मेहता, साहिल मेहता उपस्थित होते.

## 'ऑपरेशन सिंदूर'च्या मराठी आवृत्तीचं प्रकाशन

**पुणे :** मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे १३ जून, २०२६ रोजी 'ऑपरेशन सिंदूर' या लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस लिखित इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद मराठी वाचकांसाठी प्रकाशित करण्यात आला. एअर मार्शल भूषण गोखले यांच्या हस्ते या मराठी अनुवादाचं प्रकाशन भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या फिरोदिया सभागृहात करण्यात आलं. या प्रकाशनाच्या वेळी ज्या सव्वीस कुटुंबांनी त्यांच्या कुटुंबाचा आधार गमावला अशांमधील आसावरी जगदाळे यांनी त्यांच्या वेदनामयी आठवणीला उजाळा दिला. 'भारतीय सेनेला 'सशस्त्र सेना' म्हणायला हवे, 'संरक्षण सेना' म्हणू नये. तोच नवीन भारत असेल,' असे मत एअर मार्शल भूषण गोखले यांनी व्यक्त केले. तसेच, 'काश्मिरी जनतेची भारताकडे पाहण्याची मानसिकता सकारात्मक होत चालली होती; हे पाकिस्तानला




पाहवत नव्हते. त्यामुळेच पाकिस्तानने पहलगाम हल्ल्याचा कट रचला. तसेच, आपल्या हल्ल्यानंतर इतके चोख प्रत्युत्तर मिळेल, असा विचार पाकिस्तानने स्वप्नातही केला नसेल. देशाचे हे प्रत्युत्तर जनमानसाच्या स्मृतीत नोंदवले जावे, हीच 'ऑपरेशन सिंदूर' पुस्तकामागील भूमिका आहे.' असं मत लेफ्टनंट जनरल हसबनीस यांनी व्यक्त केलं.

सदर पुस्तक भारतीय संरक्षण व्यवस्थेतील अनेक घटकांवर सखोल विवेचन करत असल्याचं अनुवादक प्रसाद कुलकर्णी यांनी सांगितलं. तर, या वेळी अखिल मेहता यांनी पुस्तक प्रकाशनामागील भूमिका स्पष्ट केली.

'ऑपरेशन सिंदूर' या पुस्तक प्रकाशनच्या वेळी लेखक लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस, अनुवादक प्रसाद कुलकर्णी, प्रकाशक अखिल मेहता, साहिल मेहता, रूपा मेहता आदी उपस्थित होते. अक्षय वाटवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## लेखक संवादातून उलगडली 'क्षमा' कादंबरी

**पुणे :** मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनात १४ जून, २०२६ रोजी कन्नड लेखिका सहना विजयकुमार यांच्या 'क्षमा' या कादंबरीच्या मराठी अनुवादाचा प्रकाशन सोहळा पार पडला. अपर्णा नायगांवकर यांनी या कादंबरीचा मराठी अनुवाद केला आहे.

या वेळी प्रख्यात अनुवादिका डॉ. उमा कुलकर्णी यांनी सहना विजयकुमार यांच्याशी संवाद साधला. त्यात 'उदयास्त', 'कशीर' आणि 'क्षमा' या कादंबऱ्यांच्या लेखनामागील प्रेरणा, कादंबरीलेखनासाठी केलेला अभ्यास,

संशोधन आणि प्रवास या विविध टप्प्यांबद्दल संवाद साधला गेला. यावर बोलताना सहना विजयकुमार यांनी सांगितले की, ''तिन्ही कादंबऱ्यांचे विषय वेगवेगळे असले तरी प्रत्येक पुस्तकाच्या लेखनापूर्वी संबंधित विषयाचा सखोल अभ्यास मला करावा लागला. त्यासाठी विविध ठिकाणी प्रवास करून संबंधित व्यक्तींशी संवादही साधावा लागला. या प्रक्रियेमुळे लेखन अधिक समृद्ध झाले.'' तसेच त्यांनी कन्नड-मराठी साहित्यिक ऋणानुबंधांबाबतही आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच त्यांनी डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या सहवासातून मिळालेली प्रेरणा आणि समृद्ध करणारे अनुभव याकडेही लक्ष वेधले. या कार्यक्रमाला वाचकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाला लेखिका सहना विजयकुमार, ज्येष्ठ अनुवादिका उमा कुलकर्णी, प्रकाशक अखिल मेहता आणि साहिल मेहता उपस्थित होते.

◆



## विशेष लेख

# डॉक्टरांसमोरील बदलती आव्हाने

'डॉक्टर, तुम्ही माझ्या मुलाला आत्ताच स्प्रे लिहून दिलाय त्याची सवय लागेल का?' किंवा 'त्याच्यामध्ये स्टिरॉइड आहे का?' असे एक ना अनेक प्रश्न मोबाइलवर लिहून आणलेले असतात आणि आजकालच्या आया हे सगळे प्रश्न संपवूनच बाहेर पडतात. इन्टरनेट आणि सोशल मीडियावरील सर्व वैद्यकीय माहिती योग्य असते असं नाही; तर अनेकदा ती अपूर्ण किंवा चुकीचीपण असते.

पूर्वी डॉक्टरांनी औषध दिलं की, ते भक्तिभावानं घेतलं जायचं; परंतु आता डॉक्टरांना खूप प्रश्नांना उत्तरं द्यावी लागतात. आजकाल 'ऐकावं जनाचं आणि करावं मनाचं' याप्रमाणे डॉक्टरांनी जरी काही सांगितलं, तरी आपल्या मनाप्रमाणेच निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य आईला असतं. आजचा काळ खूप वेगवान, स्पर्धात्मक आणि बदलणारा आहे. विज्ञान-तंत्रज्ञान (A.I.), शिक्षण, जीवनशैली आणि समाजव्यवस्था यामध्ये होत असलेल्या बदलांचा थेट परिणाम आरोग्य क्षेत्रावर होत आहे. त्यामुळे डॉक्टरांसमोर असणाऱ्या आव्हानांमध्ये वाढ तर झाली आहेच; परंतु उपचारपद्धती, रुग्णांची अपेक्षा, पालकांची मानसिकता आणि आजारांचं स्वरूप यामध्येसुद्धा खूप मोठे बदल झाले आहेत. या बदलत्या परिस्थितीत आरोग्यसेवा अधिक परिणामकारक, संवेदनशील आणि आधुनिक बनवण्याची गरज निर्माण

झाली आहे. डॉक्टरांना उपचारांसोबत समुपदेशन आणि गैरसमज दूर करण्याचं काम करावं लागतं.

**डॉक्टरांसमोरील बदलती आव्हानं** : पूर्वी बालरोगतज्ज्ञांकडे जुलाब-उलट्या, टायफॉइड, मलेरिया, इतर संसर्गजन्य आजारांमुळे आजारी पडलेली मुलं यायची. आता परिस्थिती बदलली आहे. सरकारी लसीकरण मोफत असल्यानं सर्व मुलांना ते दिलं जातं. रोटा व्हायरस नावाचा जुलाब-उलट्यांचा आजार जवळजवळ नाहीसा झाला आहे. त्यामुळे ॲडमिट करण्याचं प्रमाणपण कमी झालेलं आहे. लसीकरणाचं महत्त्व पालकांना समजायला लागलं आहे. त्यामुळे संसर्गजन्य आजारांचं प्रमाण कमी-कमी होत चाललं आहे.

वैद्यकीय क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल हेल्थ रेकॉर्ड्स, टेली मेडिसिन, अत्याधुनिक तपासण्या यांचा वापर वाढला आहे. डॉक्टरांना सतत अद्ययावत राहून नवीन ज्ञान आत्मसात करावं लागतं. रुग्णांच्या वाढत्या अपेक्षा, वेळेची मर्यादा, कायदेशीर बाबी तसेच CONSUMER ACT आणि समाज माध्यमांवरील त्वरित प्रतिक्रिया यामुळे वैद्यकीय व्यवसाय अधिक आव्हानात्मक बनला आहे.

**बदलत्या उपचार पद्धती :** गेल्या काही दशकांत वैद्यकीय उपचारांमध्ये क्रांतिकारी बदल झाले आहेत. पूर्वी अनेक आजारांचे निदान उशिरा होत असे. आजकाल स्क्रीनिंग कार्यक्रमांमुळे रोग लवकर ओळखता येतात. उदाहरणार्थ कॅन्सर किंवा थायरॉइड. आतातर थायरॉइड स्क्रीनिंग आपण जन्मतः केलं तर मतिमंदत्व टाळू शकतो. तसंच नवजात अर्भकाच्या साखरेचं प्रमाण मोजलं गेलं आणि त्याची काळजी घेतली, तर येणारं मतिमंदत्व टाळलं जाऊ शकतं. मतिमंदत्वाची अनेक कारणं असू शकतात; परंतु काही उपचार वेळेवर केल्यास मतिमंदत्व निश्चितच टाळू शकतात.

डाउन सिंड्रोमसारखे आजार आपण पोटातच ओळखू शकतो आणि जीन ट्रान्सप्लान्ट करून बाळाला जन्म देऊ शकतो. फिटल जेनेटिक थेरपीनं खूप मोठी क्रांती घडली आहे. लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया, रोबोटिक सर्जरी, आधुनिक लसीकरण, लक्षित - वैयक्तिक उपचार यामुळे हे उपचार अधिक अचूक आणि प्रभावी झालेले आहेत.

आता पालकसुद्धा खूप जागरूक झालेले असून ते आम्हाला विचारतात की, माझं बाळ सतत आजारी पडत असेल, तर आजारी पडू

नये यासाठी प्रतिबंधक उपाय कोणता? त्यामुळे आजार झाल्यावर उपचार या संकल्पनेऐवजी आजार होऊ नये म्हणून काय करता येईल, यावर हल्लीचे पालक विचार करू लागले आहेत. नियमित व्यायाम, संतुलित आहार, लसीकरण, मानसिक स्वास्थ्य आणि नियमित आरोग्य तपासणी यांना अधिक महत्त्व दिलं जात आहे.

**मुलांची व पालकांची बदलती मानसिकता** : आजची मुलं डिजिटल युगात वाढत आहेत. मोबाइल, इन्टरनेट, सोशल मीडिया, ऑनलाइन शिक्षण यांचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर मोठा प्रभाव आहे. माहिती मिळवण्याची क्षमता वाढली असली, तरी शारीरिक हालचाली कमी होणं, मैदानी खेळांचा अभाव, स्क्रीनचं व्यसन, एकाग्रतेच्या समस्या आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्या वाढत आहेत.

पालकांची मानसिकताही बदलली आहे. अनेक पालक आपल्या मुलांचं शिक्षण, करिअर आणि यशाबद्दल अधिक जागरूक आहेत. बऱ्याच वेळा अपेक्षांचं ओझं मुलांवर पडतं, स्पर्धा, गुण, प्रवेशपरीक्षा, करिअर यांच्यामुळे मुलांमध्ये ताण, चिंता आणि नैराश्य वाढताना दिसतं. काही पालक मुलांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. प्रत्यक्षात मानसिक स्वास्थ्य हे शारीरिक आरोग्याइतकंच महत्त्वाचं आहे. डॉक्टर, शिक्षक आणि पालक यांनी एकत्रितपणे मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणं आवश्यक आहे. मुलांना ऐकून घेणं, त्यांच्याशी संवाद साधणं, भावनिक आधार देणं आणि स्क्रीनटाइम यावर नियंत्रण ठेवणं ही काळाची गरज आहे. स्क्रीन टाइमवर नियंत्रण ठेवण्यासाठी संपूर्ण घरानं जेवताना सगळ्यांचे मोबाइल स्वयंपाकघराच्या बाहेरील ट्रेमध्ये ठेवावेत. झोपण्याच्या आधी एक तास मोबाइल सर्वांनी बंद ठेवावे. मैदानी खेळ किमान एक तास खेळावेत. अशा वेगवेगळ्या उपायांनी मोबाइलची सवय तुटू शकते.

**नवीन आजार आणि उपचारांचा बदलता प्रवास** : नॉन-कम्युनिकेबल डिसीज प्रिव्हेन्शन याला आता महत्त्व आलेलं आहे. म्हणजे संसर्गजन्य नसलेले आजार; उदाहरणार्थ स्क्रीनचं व्यसन, लठ्ठपणा, शिकण्यातल्या अडचणी, ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर. पूर्वी ऑटिझमची लक्षणं असणारा महिन्यातून एखादा पेशंट असायचा. आता दररोज एक पेशंट असतो, एवढं प्रमाण वाढलेलं आहे. अटेन्शन डेफिसिट हायपर ॲक्टिव्हिटी डिसऑर्डर,

शाळेत मागे पडणे, किशोरवयीन मानसिक आरोग्याच्या समस्या, हृदयविकार, कर्करोग, ऑटो इम्युन विकार या समस्या खूप वाढत आहेत. सुदैवानं वैद्यकीय संशोधनामुळे अनेक नवीन उपचार उपलब्ध झालेले आहेत. आधुनिक लसी, जैवतंत्रज्ञानावर आधारित औषधं, जनुकीय उपचार आणि पुनर्वसनाच्या प्रगत पद्धती यामुळे अनेक रुग्णांचं जीवनमान सुधारत आहे.

**बदलत्या विचारधारेचा शरीर आणि मनावर परिणाम :** सोशल मीडियावरील आभासी जग आणि वास्तवातील जीवन यामधील अंतर अनेकांना मानसिकदृष्ट्या अस्वस्थ करतं. विशेषतः किशोरवयीन मुलांमध्ये आत्मप्रतिमा, शरीरयष्टीबद्दलची चिंता आणि सामाजिक स्वीकार याबाबतीला ताण वाढलेला आहे. यासाठी समुपदेशन, तसेच काही वेळेला नैराश्य किंवा चिंताग्रस्तता यासाठी योग्य ती औषधे द्यावी लागतात.

**सुदृढ आरोग्य आणि मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक काळजी :**

आरोग्याची व्याख्या करताना 'डब्ल्यूएचओ'नं असं सांगितलं आहे की, केवळ रोग नसणं म्हणजे चांगलं आरोग्य नाही तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या निरोगी असणं म्हणजे चांगलं आरोग्य.

संतुलित आणि पौष्टिक आहार घेणं, नियमित व्यायाम करणं, पुरेशी झोप घेणं, व्यसनांपासून दूर राहणं ही आरोग्याची मूलभूत तत्त्वं आहेत. दिवसातून काही वेळ स्वतःसाठी राखून ठेवणं, योग, ध्यान किंवा छंद जोपासणं मानसिक स्वास्थ्यासाठी उपयुक्त ठरतं. कुटुंबीयांशी आणि मित्रांशी संवाद ठेवणं, भावनांना योग्य अभिव्यक्ती देणं आणि गरज वाटल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणं हे मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचं आहे. मुलांसाठी प्रेमळ वातावरण, संवाद, प्रोत्साहन आणि योग्य मार्गदर्शन अत्यंत आवश्यक आहे. यशस्वी होण्यासाठी बुद्ध्यांक चांगला असण्याबरोबर भावनांक चांगला असणं हे जास्त गरजेचं आहे. भावनांक कसा वाढवायचा यासाठी जन्माला आल्यापासून अठरा वर्षांपर्यंत भावनिक लसीकरण (जन्मापासून अठरा वर्षांपर्यंत वयाच्या विशिष्ट टप्प्यांवर मुलांना भावनिक बुद्धिमत्ता कौशल्ये शिकवणं) देता येतं.

शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा समतोल राखल्यास खऱ्या अर्थानं निरोगी, आनंदी आणि सक्षम समाज आपण घडवू शकतो.

**- डॉ. सुचित तांबोळी,** अहिल्यानगर

◆

## पुरस्कार

# काव्य जीवनगौरव पुरस्काराच्या मानकरी - भारती पांडे

**पुणे :** जेष्ठ कवयित्री-लेखिका-अनुवादिका भारती पांडे यांना ‘रंगत-संगत प्रतिष्ठान’ यांच्यातर्फे ६ जून, २०२६ रोजी काव्य जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते त्यांना पुरस्कृत करण्यात आलं. त्यांनी अनुवादित केलेली अनेक पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहेत. ‘आहे कट्टर तरी...’, ‘भक्तीत भिजला कबीर’, ‘एक एक पाऊल’, ‘मजल दरमजल’, ‘मयादा’, ‘पिढी दर पिढी’ यांसारखी बरीच अनुवादित पुस्तकं वाचकांच्या पसंतीस उतरलेली आहेत. त्यामुळे मेहता पब्लिशिंग हाऊससाठी हा अभिमानाचा क्षण आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भारती पांडे यांचे अभिनंदन! पुढील वाटचालीस शुभेच्छा!

# डॉ. जयसिंगराव पवार यांना मरणोत्तर 'राजर्षी शाहू पुरस्कार' प्रदान

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू छत्रपती मेमोरिअल ट्रस्ट, कोल्हापूर यांच्यातर्फे दिला जाणारा अत्यंत मनाचा ४०वा 'राजर्षी शाहू पुरस्कार - २०२६' हा प्रख्यात इतिहास संशोधक - लेखक - शाहू विचारांनी प्रभावित होऊन आयुष्य जगणारे 'डॉ. जयसिंगराव पवार' यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. समाज प्रबोधन, समाजसेवा, साहित्य, कला, संस्कृती, संगीत, शिक्षण आणि क्रीडा या क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महान विभूतींना १९८४पासून हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे. या वर्षी २६ जून, २०२६ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या १५२व्या जयंती दिनी, शाहू स्मारक इथे या भव्य पुरस्कार सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. जयसिंगराव पवार हे शाहू विचारांचा जागर करून समाजमनात इतिहासाची रुची निर्माण करणारे लेखक होते. अशा आठवणींतून कर्तृत्ववान साहित्यिकाला मरणोत्तर पुरस्कार देताना जयसिंगराव पवारांचे शब्दबद्ध विचार पुढील अनेक पिढ्या घडवत राहतील हे इच्छापुष्प त्यांच्या चरणी अर्पण..!

◆

## नियुक्ती

# राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी डॉ. मंजुश्री पवार

**कोल्हापूर :** इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांची शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी नियुक्ती करण्यात आली. दिवंगत इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या त्या कन्या आहेत. कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. अरुंधती पवार, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते. डॉ. जयसिंगराव पवार यांची मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे 'आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध' 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध' 'मराठेशाहीचे अंतरंग' इ. इतिहास संशोधनपर पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

राजर्षी शाहू महाराज यांचे विचार, कार्य आणि इतिहास यावर डॉ. जयसिंगराव पवार यांनी सखोल संशोधन केले. हा संशोधनाचा वारसा आणि त्यासोबत सामाजिक परिवर्तनाचे विचार पुढे नेण्याचा मानस डॉ. मंजुश्री पवार यांनी व्यक्त केला. त्यांना मेहता पब्लिशिंग हाऊसकडून शुभेच्छा!

◆


# श्रद्धांजली

## सुमधुर स्वर शांत झाला!

मराठी भावसंगीत तसेच मराठी-हिंदी सिनेसंगीतावर तब्बल सात दशकं आपल्या मधुर स्वरांची भुरळ पाडत रसिकांच्या मनात रुंजी घालणाऱ्या ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर या ३१ मे, २०२६ रोजी अनंतात विलीन झाल्या. त्यांनी जवळपास ७४० चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. 'अरे संसार संसार', 'निंबोणीच्या झाडामागे', 'सांग कधी कळणार तुला' अशा गाण्यांतून अनेक पिढ्यांच्या मनात भावनिक स्थान त्यांनी निर्माण केले. आजही 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे', 'तुमने पुकारा और हम चले आए' यांसारख्या सुप्रसिद्ध हिंदी चित्रपट गीतांची धुंदी उतरत नाही... पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित सुमन यांचा भक्तिगीत, भावगीत, बालगीत, अंगाईगीत, चित्रपटगीत अशा विविधांगी गीतांना स्पर्शणारा सुमधुर स्वर मात्र शांत झाला. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे सुमन कल्याणपूर यांना भावपूर्ण श्रद्धांजली..!

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# मोहरलेला चंद्र

**बाबाराव मुसळे**

पृष्ठे : २२८
किंमत : ३५०

*ग्रामीण जीवनातल्या दैनंदिन घटनांमधून व्यक्ती आणि वल्लींच्या भावछटा मांडणाऱ्या दर्जेदार कथा*

## देवाचा न्याय

दहा वर्षांत गाव होत्याचा नव्हता झाला.

अगोदर गाव कसा होता?

झाडून सर्व गावात दारू पिणारं अन् मटण खाणारं कोणी सापडलं नसतं. गावात बारा आणे घर वारकऱ्यांचे. या वारकऱ्यांच्या घरच्या लहान-मोठ्या सर्वांच्या गळ्यात सुपारीसारख्या ठोकर मण्यांच्या माळा. घरात देव तर होतेच;

पण गावातील देवांनाही भजत. त्यातल्या त्यात सर्वांचा राबता मारोतीच्या पारावर जास्त होता. याशिवाय दर महिन्याच्या एकादशीला गावातून दोघं जण पंढरपूर-आळंदीच्या वारीला जात. त्यांच्यासाठी गावातील सर्व जण वर्गणी करून पैसा उभा करायचे. कोणाचे चार आणे, कोणाचे आठ आणे, कोणाचा रुपया, तर कोणाचे दोन रुपये. आषाढी-कार्तिकीच्या वारीला तर घरपिच्छे एक माणूस, एक बाई निघे. दोन एस. टी. बस भरत. बसा धकल्या, की पंढरपूर-देहू-आळंदी-नाशिक-त्र्यंबक असा येढा करूनच गावाकडे परत येत.

हे झालं गावाबाहेरचं. गावात सर्वांचा जोर मारोतीवर. तसे बाकीच्या देवांचेही येल्हे होत नव्हते. मारोतीचा पार मोठा, त्याच्यावर पत्रं चौकून खिळाटलेले. म्हणजे बसाय-उठाय मोकळी जागा. त्यात मारोतीचं देऊळ गावाच्या मधोमध. गावोगावचे मारोती तसे गावाच्या एका अंगाला गाववेशीवर असतात. मारोती वेशीची राखणदारी करतो, म्हणतात. मग हा मारोती कसा गेला गावाच्या मधात? जुन्या काळी मारोती गाववेशीवरच होता, म्हणतात. पुढं गाव वाढला आणि मारोती मध्ये आला.

तर मारोतीच्या पारावर रातदिवस दांगडो- भजनापूजनाचा, उठणारा-बसणारांचा, रात्री झोपणारांचा. पहाटे दिवस निघण्याअगोदर दररोज पखवाद-टाळांच्या दणक्यात काकडआरती व्हायची, मग आरती. दुपारी भजन-हे भजन बुढ्याबाढ्यांचं. संध्याकाळी झाक पडली की, आधी म्हाताऱ्याकोताऱ्यांचा हरिपाठ. नंतर तरण्याताठ्यांचं भजन. आषाढ-श्रावणात पोथी लागायची. संध्याकाळी जेवणं झाले, की गावकऱ्यांची पारावर झुंबड व्हायची. पोथी वाचणारा सकाराम टेलर अन् फोडून सांगणारा गोसाई मास्तर. या दोघांचे हात धरणारे वाचनकार-फोडणकार अवताल भवताल दहा कोसात नाहीत. एका दिशी एक अध्याय, असे करत करत शेवटी समाप्तीचा दिवस यायचा. समाप्तीच्या आदल्या दिवशी न सांगता पारावर गहू, तांदूळ, दाळ येऊन पडायची. गावाला दोन पोते माल लागत असला, तर कधीही दुप्पट माल जमा व्हायचा. या बाबतीत हात आखडण्याचा छाकटेपणा कोणी करत नसे.

पोथी असो वा नसो, दर पंधरवाड्या एकादशीला कीर्तन ठरलेलंच. कीर्तनकारही ठरलेला. सखाराम मानदाराचा नारायण. दोन वर्षे आळंदीला शिकला. भजन असो, कीर्तन असो, कोणी कोणास न म्हणता पाच-पन्नास लहान-मोठे टाळकरी उभे राहायचे.

ही झाली भजना-पूजनाची गोष्ट. पण एरव्ही कधीही मारोतीच्या पारावर रात्री झोपणाऱ्यांच्या गर्दीत पाय ठेवायला जागा सापडत नसे. गावातील पोऱ्हंसोऱ्हं, म्हातारेकोतारे, आपापली जागा जितून घेत. एकदा का जागा जितली की, तिच्यावर दुसरा झोपणार नाही. जोपर्यंत तो झोपणारा एक तर देवाघरी जात नाही किंवा त्याचं लग्न होत नाही, तोपर्यंत एका एका जागेची दहा-दहा जणं वाट पाहत असत. तसं कोणी मरावं अन् आपल्यासाठी जागा खाली व्हावी, असे कोणालाच वाटत नव्हतं. पण एखाद्याचं लग्न व्हावं, असं सर्वांना वाटे. पण कशाचं काय? लग्न झालेले असे गोचिडासारखे की, लग्न झाल्यावर घरचीचं तिकडे काही का होये ना; एकापरी ती आपल्याला कायमची सुटली, तरी चालेल; पण ही पारावरची जागा सुटू नये, अशी त्यांची धडपड चाले. लग्न झालेल्या अशा पोरासोरांवर त्याचे माय-बाप डाफरत, त्याला घरी झोपायला सांगत; पण तो चाट मारून पारावर येई. बऱ्याचदा त्याला पारावरून जबरदस्ती घरी नेलं जाई. काही काही बहाद्दर घरून अर्ध्यागती पारावर येऊ पाहत; पण अशांना 'भ्रष्टाचार व्हते' असे म्हणून बाकीचे वर येऊ देत नसत. अशी रिकामी झालेली जागा जितण्यासाठी मग सर्वांच्या उड्या पडत. त्यात ज्याचा जोर जास्त, त्यालाच ती जागा मिळे.

हे झालं पारावरचं. गावात घरोघरी देवादिकानं देव्हारे-कोनाडे भरलेले. किन्हाटलेल्या मदऱ्यात कधी काळी आज्यापणज्यानं बांधून ठेवलेल्या पोथ्या दररोजचे अष्टगंध, कुंकू पिऊन पिऊन कुजून गेलेल्या. एकाही मदऱ्यात सर्व पानं शाबूत असणारी पोथी सापडणार नाही. पानं भोवतालून कुरतुडलेले, काळपट पिंगट पडलेले. असे असलं, तरी दररोज त्यातला अर्धा, कधी एक अध्याय नेमानं वाचला जायचा. वाचणाराचा खाक्या असा की, निमित्ताला पान पुढं धरायचं अन् त्याकडे न पाहताच भडभड ओव्या म्हणायच्या. इतक्या दिवसांच्या वाचनानं सर्व पोथी तोंडवळणी पडलेली.

असं सर्व गाव दहा वर्षाअगोदर अष्टगंध, देवधर्म, पोथ्यापुराण टाळ-मुडदुंगात बुडालं होतं. आज मात्र त्यांपैकी काहीही शिल्लक उरलं नाही. त्यात जमीन-अस्मानाचा पालट पडला.

कसा पडला हा पालट? कोणी पाडला हा पालट? त्याचीच हकिकत आता सांगायची.

दहा वर्षाआधी अशा या माळकरी, सवळ्या गावात वडाखालच्या रामा

पखवाद्याचा जीव गेला. त्याचा उभा जन्म पखवाद वाजविण्यात गेला. त्यानं चार-दोन पोरंही शिकविले. त्यामुळं उतारवयात त्याला पखवाद वाजवायचं काम पडलं नाही. तसं थकल्या पराईमुळं वाजवितो म्हटलं, तरी त्यांच्या अंगात तवाखा नव्हता.

एवढी जिवाभावानं मारोतीरायाची सेवा करून तो मरण पावला; पण त्याच्या तोंडात अखेरचे दोन थेंब सोडायला कोणीही नव्हतं. त्याच्या पोटी पोरगं नव्हतंच. होती एक पोरगी. ती तिच्या नवऱ्याच्या घरी. तो मेल्यावर दुसऱ्या दिवशी रडत-रडत आली. पोरगं नसण्याची खंत नेहमी त्याला वाटे.

''मापलं आधिल्ल्या जल्माचं काही पाप असंल. मनून पोटी पोरगं देलं नाही देवानं...''

यावर जवळ बसलेला कोणीतरी म्हणायचा,

''अरे, काय करतं पोराचं? अशी का तुही इस्टान वाया चालली? आम्हाले चार-चार पोऱ्हं असून, पाहात नाही, आमचे कसे येल्हे चालले, ते? पाणी भेटलं, त भाकर नाही भेटत, भाकर भेटली, तं पाणी नाही दिसत डोळ्यानं... तुले ह्या कटकटी नाहीत... मस्त हाये तुव्हं... मरशील, तव्हा लडू लडू मडं साजरं करायले पोरगी देली देवानंच... त्यातच सुक मानावं. कस मन्तो?''

यावर रामा पखवाद्या मान डोलवायचा अन् पायांत मुंडी खुपसून म्हणायचा,

''...अबे, पण मरता मरता तोंडात चार थेंब पाणी टाकायपुरतं तरी पोरगं पाहिजे व्हतं ना? जलमभर त्यांच्या लाथा खाल्ल्या, तरी त्याच्यामुळंच सोर्गात जागा मिळाली असती. मले काहाचा आला आता सोर्ग?...''

त्यावर कोणीतरी म्हणायचा,

''कशाचा सोर्ग, कशाचा नर्क? आपण जे जगायलो, तेच खरं.''

हे म्हणणं सगळ्यांना पटायचं.

रामाजवळ गावात दहा पत्राचं घर अन् आठ एकर भोय होती. रामा मेला अन् त्याच्या जावयानं घरावर, वावरावर हक्क बसविला. स्वत:चं गाव सोडून या गावात राहायला आला. एऱ्व्ही फार काम-कटाळ्या. नावाचा हरी- 'दे रे हरी, पलंगावरी' या वृत्तीचा. फार दिवसांपासून सासऱ्याच्या इस्टेटीवर त्याचा डोळा होता; पण बायकोच्या नकारापुढं त्याला जाता येईना. आता मात्र

आयती संधीच चालून आली.

आयत्या बिळावरचा हा नागोबा गावात राहायला आला अन् गावात हळूहळू विष पसरू लागलं. गाव नासायला सुरुवात झाली.

तसं म्हटलं, तर सर्व जगच बदलायलं. भारताला स्वातंत्र्य मिळालं, तसा भारत बदलायला लागला, भारतातील गावंही बदलायला लागले. रस्ते, मोटारी, इलेक्टरी, सरकारच्या योजना घेऊन गावात येणारी सरकारी माणसं, शाळा, कारखाने ह्या सगळ्यांमुळं गावांची रूपं बदलू लागली. या तडाख्यातून हेच गाव किती दिवस वाचणार? या गावातही बदल झाले. गावाजवळून सडक गेली. गावात इलेक्टरी आली. पूर्वी पंढरपूरच्या यात्रेला जायचं म्हटलं किंवा बाजाराला जायचं म्हटलं, तर वाशिमपर्यंत पाच कोस पायी पायी जावं लागत असे. आता डायरेक्ट गावातच एस.टी. येते. मारोतीच्या गाभाऱ्यातच काय, घरोघरच्या तेलाच्या दिव्यांच्या जागी रात्रंदिवस मूनलाइट जळू लागले. शेतीसाठीच्या सरकारी योजना, विहिरीवरचे मोटारपंप यांमुळे लोकांचं उत्पन्न भरमसाट वाढलं. सर्व गावकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. पण गावकऱ्यात काही फरक पडला नाही, अष्टगंधाचा टिळा अन् त्यावर टोपी किंवा पडक्याचे फेरे. चुकूनमाकून एखादा पोरगा बोडखा फिरू लागला, तर त्याला मोठी माणसं हिणवायची.

तरीही ह्या गावाला बिघडायल्या जास्त काळ लागला नाही.

ही सारी करामत हरीची.

हरीनं तरी असं काय केलं? एकटा माणूस गाव बिघडवू शकतो का? संपूर्ण हकिकत ऐकल्यावर कोणीच 'नाही' म्हणणार नाही.

रामा पखवाद्या मेल्यावर हरी या गावात आला. पहिलाच ऐदी. त्यात गाव सोयऱ्याचं. त्याच्यामुळं तो कोणाच्याच कामाला जायेना. सासऱ्याच्या घरातही काहीच नव्हतं. हरीच्या गावाकडंही उन्हाळाच होता.

काय करावं?

त्यानं डोकं चालवलं. सासऱ्याच्या दोन एकर वावराचा सौदा केला. त्याचे पाच हजार रुपये आले. घरखर्च बसल्याजागी सुरू झाला. त्यानं मनाशी विचार केला, ''हे पैसे असेच आपण उधळले, तर महिन्या दोन मह्यन्यांत हातात काय उरल? डाफन्या!''

तो विचार करू लागला, बसता-उठता, खाता-पिता.

-अन् एक दिवस त्याला आयडिया सुचली. तेव्हा चुटकी वाजवून त्यानं खुशीत मान हलविली.

वाशिमवरून आलेली सडक पुढं पुसदला जाते. ही सडक अंबूऱ्याच्या गावाच्या खालतील्ल्या खारीला खेटून पुढे जाते. म्हणजे गावापासून फार तर अर्धा फर्लांग दूर, अंबूऱ्याच्या खारीतल्या विहिरीजवळच्या सडकेवरच्या लिंबाखालीच लोक गाडीची वाट पाहत बसतात. बऱ्याचदा गाडीची फार वेळ वाट पाहावी लागते. बसू बसू कंटाळा येतो. ही गोष्ट हरीनं हेरली. अन् दुसऱ्याच दिवशी त्यानं लिंबाखाली चार फाटे आडवेतिडवे बांधले अन् झोपडं तयार केलं. भोवताली माणसं विचारत,

''काय करता हे जवाईबुवा?''

तो गावजावाई. त्यामुळे बहुतेक सर्वच जण त्याला नावानं न हाका मारता 'जवाईबुवा' म्हणत.

त्यावर तो म्हणाला,

''तुमच्या गावचं अन्नपाणी खायाचं मनल्यावर तुमची काहीतरी सेवा करा लागंल ना, मामा? आयतं बसून थोडंच तुम्ही मले खाऊ घालणार हा?''

''हो हो, बराबर हाये,'' म्हणत सगळे जण मान हालवत.

दोन-चार बश्या, एक फुटकी गुंडी, दोन जर्मली गिलास, चहा करण्यासाठी घरी वापरू वापरू ढबर झालेलं जर्मनी भगुणं - तेही बायको देये ना. त्याच्यासाठी तिच्याबरोबर भांडण करायचं काम पडलं- झालं त्याचं भांडवल. त्याचं हॉटेल सुरू झालं. सकाळीच पाच-सहा कप दूध, एक-दोन किलो साखऱ्या, चहाचा पुडा घेऊन गिऱ्हाइकांची वाट पाहू लागला.

पहिल्या दिवशी त्याच्या हॉटेलकडं कोणीच कलूनही पाहिलं नाही. दिवसभरात पाचपन्नास माणसांची ये-जा येथून झाली असेल, पण हरीला हातपाय हलवायचं काम पडलं नाही, या गोष्टीचा त्याला धक्काच बसला. त्याची कल्पना काही औरच होती. पण सर्व मामला घाट्यात आला. तसा घाटा काहीच नाही; दूधच दुसऱ्या दिवशी वापरता येणार नाही. म्हणून घरी पोरांना पाजायचं काम पडलं. बाकीचं सामान दुसऱ्या दिवशी वापरता आलं. पण दुसराही दिवस तसाच केला. चहा तर दूरच, पाणी प्यायलाही कोणी त्याच्या हॉटेलात फिरकत नव्हतं. कपाळावर आठ्या पाडून तो दिवसभर माश्या मारत विचार करे,

‘माय, मी तं कसं इचकेल गाव हाये मनावं ह्ये?’

हे गावच तसं होतं. हरीच्याच हॉटेलात काय, कुठल्याच हॉटेलात कोणी कव्हा जात नव्हतं, अकरबकर खात नव्हतं. चहानं तर अवचट कोणाचा कधी जीव बाटला असंल, देव जाणे.

आणखी एक-दोन दिवस असेच गेले. तेव्हा तो कंटाळला. ‘ह्यो कुटाणा करून आपण गधेपणा केला,’ असे त्याला वाटू लागलं.

पाचव्या दिवशी दुपारी असाच विचार करत बसला असता अचानक गावचे इठोबा पोलीस पाटील त्याच्या झोपड्यात आले. त्यांच्यासोबत दुसरा कोणी साहेब होता. इठोबा पाटलांना पाहून हरीचा ऊर दडपला. हे यंधवा हॉटेलात कसे आले? त्याला विचार पडला. त्यालाच कशाला, लिंबाखाली गाडीची वाट पाहत जेवढे लोक बसले होते, त्या सर्वांच्याच कपाळांवर अष्टगंधाच्या पट्ट्यासारख्या आठ्या पडल्या.

तसं पाटलानं हरीच्या हॉटेलीत चहाच काय, पण पाणीही पिलं नाही, त्या साहेबांसाठीच त्यांनी हरीला चहा करायला सांगितला. साहेबाच्या चहाचे पैसे देताना उलट हसून, पण खोचकपणे पाटलानं म्हटलं,

‘‘जवाईबुवा, लोकाह्यच्या तोंडच्या बश्या इसळायचा ह्यो हलकट धंदा सोडून द्या. दुसरं काही सुरू करा.’’

हे ऐकून हरी नुसताच हसला अन् तो साहेब मात्र कानपला. पाटलानं आपल्यालाच हलकट म्हटलं, असे त्याला वाटलं.

इठोबा पाटलानं जणू त्याच्या हॉटेलचं उद्घाटन केलं. कारण तेव्हापासूनच खरं गिऱ्हाईक सुरू झालं. इठोबा पाटील हॉटेलात येण्याअगोदर कोणीच त्याच्याकडं फिरकत नव्हतं अन् आता हरीला नाक पुसायला फुरसद मिळत नव्हती. त्याचं चुल्हाण बसच्या शेवटच्या टायमापर्यंत ढणढणत होतं. इठोबा पाटलाचा पायगुण म्हणावा हा.

पण पायगुणाची गोष्ट खरी नव्हती. खरी गोष्ट वेगळीच होती. कोणतीही नवीन गोष्ट करायची असली, तर या गावच्या मुखंडानं केल्याशिवाय दुसरं कोणी करत नव्हतं. हॉटेलच्या बाबतीतही हेच घडलं. जिथं गावातील मोठी मोठी माणसं हॉटेलपासून चार-चार हात दूर राहतात, तिथं बाकीचे चिल्हरचाल्हर कशाला मरायला जातील? त्या दिवशी पाटील स्वत:च हॉटेलात गेले अन् मग बाकीच्यांना जणू परवानेच मिळाले. ही गोष्ट हरीला समजल्यावर हरी मनाशीच

हसत म्हणाला,

‘हे गाव निऱ्हाच अडाणचोट हाये! लोक चंद्रावर चालले अन् हे बटके हॉटेलीत येयाले राजी नाहीत.’

पण पुढं हॉटेलात गर्दी वाढू लागली. त्याला दिवसभर दहा लीटर दूधही कमी पडू लागले. भलेभले गावातून मुद्दाम चहा पिण्यासाठी हॉटेलवर येऊ लागले. गावात चहाची अशी क्रांती झाली अन् मग पुढच्या क्रांतिकारक गोष्टी आपोआपच घडत गेल्या. हॉटेलचंही रूप बदललं. झोपड्याच्या जागी पत्रं आले. कपबश्यांपासून तो बसायच्या व्यवस्थेपर्यंत सर्वच बदल झाले. चुल्हाणाच्या जागी फर्र फर्र करत जळणारा स्टोव्ह आला. जर्मलीची भांडी-गिल्हास, भगुणं जाऊन त्या जागी स्टीलची आली.

या बदलाबरोबरच इतरही बदल जाणते-अजाणतेपणी होऊ लागले. खालच्या जातींतील माणसे पाणी पिण्याचा धीटपणा करू लागली. सुरुवातीला हे पाहून अष्टगंधाचे पट्टे खालीवर होऊ लागले; पण पुढं होऊन मांजरीच्या गळ्यात कोणी घाट बांधावी? एखादा हरीला म्हणायचाही. तेव्हा हरीचं पेटंट उत्तर असायचं,

‘गिऱ्हाईक मनजे देव, देवाले जात नसते.’

यावर बोलणाराचं तोंड बंद व्हायचं... असा गावात पहिल्यांदा सर्वधर्मसमभाव सुरू झाला, तो हरीच्या हॉटेलमुळं. या गोष्टीनं काही कट्टर माळकरी हादरले. ते हरीच्या माघारी त्याला भलंबुरं म्हणायचे; पण त्याच्या तोंडावर कोणाची बोलायची हिंमत नव्हती.

सकाळी दिवस निघाल्यापासून तो रात्री शेवटची वाशिमहून पुसदकडे जाणारी एस. टी. जाईपर्यंत हॉटेलमधील गर्दी कमी होत नसे. चहापाण्यासोबत आता हरी भजे, चिवडा, सेव, पापडीही काढू लागला. बसल्या बसल्या पैसा मिळत होता अन् गावातील भानगडीही लोकांच्या बोलण्यातून कळत होत्या. शेवटच्या गाडीची वाट पाहणारे हरीनंच लखवलेले होते. त्यांच्यासाठी उजेड म्हणून त्यानं वाशिमहून मुद्दाम बत्ती आणली. बत्तीच्या भकभक उजेडात बसणारे गप्पा करत अन् कागदही काळे करत आणि मग शेवटची गाडी आली, की हरीसह सगळे जण बाहेर येत. हरीचा गडी-तेल्याचा नाम्या गाडीतून उतरण्याची वाट पाहत. तो उतरला, की त्याच्या भोवताल गोळा होत. नाम्याही त्यांनी त्याच्या भोवताल कोंडाळं केलं, की जोरात बोंबलायचा,

‘‘यंधवाचा ओपन पंज्या!’’

ज्याचा ओपन खुलला, ते टणटणा उड्या मारत आणि ज्यांच्या ओपननं मार खाला, ते मात्र एवढुसं तोंड करत.

हरीनं मटक्याची पट्टी सुरू केली अन् गाव भलतंच चळलं. कामधंदा सोडून लोक ओपनची-क्लोजची वाट पाहू लागले. खुल्लमखुल्ला लावणारे, तर हॉटेलवरच बसत. पण भल्याभल्या घरच्या बाया-पोऱ्ही चोरून मटका लावू लागल्या. त्यांनाही ओपन क्लोजचे आकडे बरोबर कळविले जात.

हरीचा मटका असा गावात बऱ्याच जणांच्या चुलीपर्यंत जाऊन पोचला. बाया-पोरींची दीडशे रुपयांची दररोजची पट्टी हरीच्या हाती पडत होती. गावातील माणसा-पोरांची पट्टी किती जमा होत असेल, याला गणतीच नव्हती.

हॉटेलला जोडधंदा मटका. त्यामुळं हरीचा खिसा जडजड होऊ लागला. मटकेवाल्यांमुळं हॉटेल जोरात चालू लागलं. मटकेवाले वावराशिवरांतील कामं सोडून दिवसभर हॉटेलावर बसून राहत. टाइमपास म्हणून गंजिफा सुरू होई. अन् मग दिवसभर हरीची भट्टी चालूच राही. चहा, भजे, चिवडा... गंजिफा खेळणारे टाइमपास म्हणून खेळता खेळता चहा, भज्यानं खेळू लागले. पुढं पैशानं खेळू लागले. सातपानी, लाडीस, रमी... खेळताना ज्याचा खिसा रिकामा होई, तो तावातावानं तिथल्या तिथं हरीजवळून पैसे घेई. हरीनं पैसे ठेवले की, त्याचं दहा टक्के व्याज पकलं. मग ते पैसे अर्ध्या घंट्यानं परत केले, तरी हरकत नाही.

अशा प्रकारे हरीचे बसल्या बसल्या अनेक धंदे सुरू झाले. खऱ्या अर्थानं त्यानं गावाला बुडातूनच उकरी लावली. अष्टगंध, टाळ, मुडदंग, भजन, पोथी या सगळ्यात अडथळा आणला. बऱ्याच जणांचं देवपूजेतील ध्यानच उडवलं. हळूहळू पारावरची गर्दी कमी होऊ लागली. ‘त्या हऱ्यानं समद्या गावाचं वाटूळ केलं.’ मारोतीच्या पारावर बसून चिंता करणारे असं म्हणत, तर ‘हरीमामानं आम्हाले अष्टगंधाच्या पट्ट्यातून सोडवलं.’ असे हॉटेलवर बसणारे मटकाबहाद्दर म्हणत. मटका, गंजिफा खेळणारांना गंध-टिळ्याचं जगणं आता अळणी-सपक वाटू लागलं.

गावाचं काही असो, हरीच्या हाती पैसा खेळू लागला. त्यांचे बायका-पोऱ्हं बसल्या जागी दोन घास चांगलं खाऊ लागले. सासऱ्याच्या घराजवळ असलेली एक पडकी जागा हरीनं विकत घेतली. ती बांधून काढली. गावातील

टाळकऱ्यांना हे कुसळ मुसळासारखं खुपू लागलं. ह्यो आपल्याच पैशावर गमजा करायला, असे ते कुरबुरायचे.

गावातील भल्याभल्या घरचे कर्ते पोरं भलत्याच गोष्टींच्या नादी लागल्यानं त्यांच्या कुणबिकी अडचणीत आल्या. घरचे पोरं कामधामं सोडून इळन्माळ हॉटेलावर बसत, सगळी कामं गडीमाणसांना करावी लागत. गडीमाणसे कशालाच बरकत येऊ देत ना. खंडीभर माल व्हायचा, तर त्यातील निम्मा माल परस्पर लांबवल्या जाऊ लागला. यामुळं चार-चार, आठ-आठ बैलांचे खटले झपाट्यानं आतल्या खांदी आले. ज्यांनी कधी शावकाराचं तोंड पाहिलं नाही, त्यांना आखाडतोंडी शावकाराच्या दारात जावं लागलं. व्याजाचे दरही मोठे गोड-सवाई, दिढी, पंधरा, वीस रुपये शेकडा. असे बरेच कमरेत ढिले झालेले गरजू हरीकडून व्याजानं पैसे घेऊ लागले. हरीचा असा हळूहळू हरी शावकार झाला. इतके दिवस जे त्याचा द्वेष करत, तेच आता त्याला मांडीला मांडी लावून बसवून घेऊ लागले.

या गोष्टीमुळं हरी मात्र मातला नाही, उतला नाही. तो आपली पायरी ओळखूनच वागू लागला.

एका दिवशी सगळ्या गावानंच तोंड वासलं. वामन पाटलाचा सदा असाच मटकाबहाद्दर, पण त्या दिवशी तो लवंडत, पडत, हातवारे करत, भडाभड शिव्या देत हॉटेलहून गावात आला. ना त्याचं धोतर जाग्यावर होतं ना टोपी-अंगडं! घरोघरच्या बायका दाराआडून हा तमाशा पाहत अन् उरावर हाणून घेत. मथारे-कोतारे कपाळावर हाणून गळ्यातल्या तुळशीच्या माळेचे मणी ‘हरी, हरी’ म्हणत चटचट चाळवू लागले. आपण अजूनही त्या हरीचंच नाव घ्यायलो, असं वाटून मग ‘राम, राम' म्हणायचे. त्यांच्या मनाचा गोंधळ उडे, कोणता हरी खरा? ज्यानं गावात आकात मांडला तो, की जो पंढरपूरला कमरेवर हात ठेवून निश्चल आहे, तो! देवा, देवा!

ज्यांची देवाच्या पायी अढळ निष्ठा होती, ते अचंब्यात पडले. देव असा कसा डोळे मिटून बसला, हे त्यांना कळेना. हे सर्व पाप त्याला दिसत नसेल काय? त्या हऱ्याले एखादं किडा-किडूक डसवून काऊन मारत नसंल? का तो आपलीच कसोटी पाहायला? आपलीच भक्ती कमी पडली असंल? असं मानून ते पुन: एकदा अष्टगंधात, पोथ्या पुराणात शेंडीलोक बुडाले. जगात पाप जास्त वाढलं की, देव जन्म घेतो म्हणतात. मग गावात एवढं पापाचं पेव

फुटलं, तरीही... म्हणजे ह्याच्या पापाचा घडा अजून भरला नाही म्हणायचा.

हरी शावकाराचा अस्कारा वाढू लागला. सर्व जोडधंद्यांत त्याचे दोन्ही हात सोन्याचे झाले. व्याजाव्याजावर, दारू मटक्याच्या कमाईवर त्यानं तीस-पस्तीस एकर जमीन, चार बैलं, तीन-चार म्हशी घेतल्या. घरावर इथून-तिथून सागाची जोडणी ठोकली. समोर बैठक काढली. बैठक सोडून बाकीच्या घरावर माडी उभी केली. बायकोच्या अंगावर लदबद सोन्याचे दागिने आले. त्याचा हा थाटमाट पाहून भलेभले तोंडात बोटं घालू लागले.

हरीचा मोठा पोरगा लग्नाला आला. गावोगावच्या मोठमोठ्या लोकांच्या सोयरिकी येऊ लागल्या. गावातलेही, त्यानं आपल्या पोरीशी सोयरीक करावी, म्हणून त्याच्यापुढं लाळ घोटू लागले. शेवटी चिचगावच्या राघो पाटलाशी त्यानं संबंध जोडला. पंचवीस हजार रुपये हुंडा घेतला. त्यात दुसरी गोष्ट अशी, राघो पाटलाला मुलगा नव्हता. होती फक्त एकच मुलगी. त्यामुळं राघो पाटलाची सर्व इस्टेट कधी ना कधी हरीकडंच येणार होती, हरीची नजर अशी लांब पाहणारी होती.

आता सर्व कामधंद्यांवर हरी नुसती देखरेख करू लागला. त्याच्या हातांखाली त्यानं गडी ठेवले. मटका, दारू या बाबतीत कधी कधी पोलिसांची आडकाठी यायची. ते येऊ नये, यासाठी ठाणेदाराला भेटून हरीनं हप्ता ठरवून घेतला.

हरीनं आणखी एक पाऊल पुढे टाकलं. त्यानं गावात व्हिडीओ आणला. मारोतीच्या पाराजवळची सिदा कोल्ह्याची पडकी जागा अगोदरच त्याच्या ताब्यात आली होती. ती बांधून त्या जागेत त्यानं व्हिडीओ सुरू केला. व्हिडीओनं उरलेला गाव चळला. शाळेतील पोरं, मोठमोठ्या घरच्या लेकी-सुना व्हिडीओ पाहू लागल्या.

विसोबा खेचरानं महादेवाच्या पिंडीवर पाय ठेवल्यावाणीच माळकऱ्यांना वाटलं. निदान विसोबाचा पिंडीवर पाय ठेवण्याएवढा अधिकार होता. हऱ्या तर निऱ्हा दैत्यच बनला. मारोतीच्या उरावर सुरू झालेला व्हिडीओ कसंही करून बंद व्हावा, अशा मारोतीच्या पारावर बसणारांची मनोमन इच्छा होती.

‘‘मारोतीराया पाहून घेईल त्याले,’’ असं एक जण बोलला, तेव्हा गोविंदा बुढा म्हणाला,

‘‘गडे हो, मले तं वाटते, देवाजवडे बी आता सत् उरलं नाही. हिंग

रातदिवस गांडा घासून घासून आपल्याले दोन टाइमच्या जेवणाची सोय लागत नाही. अन् ह्यो बटक्या? हात-पाय न मळवता त्यानं सात-आठ वर्षांत समदं गाव खोरी करून एवढी इस्टेट मिळवली. काही खरं नाही देवाचं! देवबी आता तशाच लोकांह्यच्या मांघ हाये. आपण येडे, लगेच दगडामव्हरं टाळ कुटत बसलो. नाव ना नफा, बांदर करे खेपा.''


''तसं नाही, रे, मानसालेच दम नाही, देवाजवडे दम हाये. पुर्थवीवर लय पाप झाल्याबिगर त्यो जल्मच घेत नाही. तसं या हऱ्याची पायली भरेस्तोर त्यो काणाडोळाच करणार हाये. त्या शिशुपालाचे एकशेतीन अन्याव देवानं पोटात घातले अन् मंग दाखवलाच का नाही हिसका त्याले? तसा देवाजवडे देर हाये, पण अंधेर नाही. त्याची नदर निसती तिरपी झाली, तं एका राततून हऱ्याचं व्हत्याचं नव्हतं व्हईल.'' इठ्ठलबुवा बांगरे कीर्तनकारासारखा बोलला.

देवाची नजर हरीवर होती किंवा नाही, ते देवच जाणे; पण जो दिवस उगवत असे, तो हरीच्या इस्टेटीत भर टाकणाराच निघे. धंदेही वाढले होते. गावातील बाराआणे लोक त्याच्या मेहरबानीवर जगत होते. यांतील बहुतेक व्याज भरून, मुद्दल तसंच ठेवणारे होते. बरेच जण एखादी जागा, वावर, बैल खट्या- काही ना काही देऊन त्याचा खंड तोडत होते. त्याच्या कचाट्यातून मोकळे होत होते. किसन अंबुऱ्यानं हॉटेलजवळची तीन एकर खारी विहिरीसकट अशीच कर्जापायी खंडवून हरीच्या ताब्यात दिली होती. असे अनेकांनी केलं. त्यामुळं हरी शावकाराचा खटला वाढला. ऐंशी-शंभर एकर जमीन, अठरा वीस पांढरेफेक बैल. पुढे त्यानं सवतल टॅक्टरही आणला. अंबुऱ्याच्या खारीत सिमेंट काँक्रीटचा मोठा कोठा बांधला. गाई, म्हशी, बैल, आऊत-फाटे सर्व काही या कोठ्यात गडप झालं. खारीच्याच कोपऱ्यात एका बाजूला हॉटेलसाठी एक खोली बांधून काढली. ज्या हॉटेलमुळं आपल्याला बरे दिवस आले, ते हॉटेल बंद करावं, असे हरीला कधीच वाटलं नाही. एवढी कमाई केल्यावरही त्यानं लोकांच्या उष्ट्या कपबश्या विसळायचं सोडलं नाही, हे पाहून बऱ्याचजणांना नवल वाटे. काही जण तसे म्हणतही. त्यावर तो म्हणायचा,

''कोणामाथं मी बरा झालो? या हॉटेलमाथं अन् लोकामाथं... मनजे तुमच्यामाथंच ना? मंग तुमच्या कपबश्या इसळायची आताच काय लाज हाये?''

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## बनगरवाडी

**व्यंकटेश माडगूळकर**

पृष्ठे : १३६
किंमत : २००

*वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैली, सुंदर चित्रं आणि समृद्ध जीवन-जाणिवा या वैशिष्ट्यांनी युक्त मराठी साहित्यातील एक अक्षर लेणं*

दशम्यांची पिशवी पाठीला मारून मी बनगरवाडीला निघालो होतो.

अद्याप सर्वत्र काळोख भरून राहिला होता. चांदण्या चमकत होत्या. समोर वळसे मारीत चाललेली गाडीवाट तेवढी फिक्कट अशी दिसत होती. रात्र किती आहे, किती वेळाने उजाडणार आहे, याचा निश्चित अंदाज बांधता येत नव्हता. मी फार लवकर तर निघालो नाही ना, अशी शंका वरचेवर मनात येत होती. माझ्याच पावलांचा

आवाज मला मोठा वाटत होता. रातकिडे किरकिरत होते. गार वारा कानाशी आवाज करीत होता. बराच वेळ चालल्यामुळे अंगात एक लय भरली होती.

वाट चुकण्याची भीती वाटत होती; कारण यापूर्वी मी कधी बनगरवाडीला आलो नव्हतो. हे गाव कसे असेल, काय असेल, तिथली माणसे माझ्याशी कशी वागतील, तिथे गेल्यावर राहायचे कुठे, असले प्रश्न मी स्वत:लाच विचारीत होतो. दोन दिवस रागरंग बघून मला परत फिरायचे होते. कायम राहायचे म्हणजे काही सामानसुमान आणायला पाहिजे होते. आज केवळ धोतर-चादर, दोन कपडे, एवढेच घेऊन मी चाललो होतो.

माळावरून गार झोंबरे वारे वाहू लागले. चांदण्यांचे तेज कमी झाले. धड चांदण्यांचा उजेड नाही, धड उजाडलेही नाही, अशी मधली अवस्था आली. बाभळी-तरवडासारख्या झुडपांचा ओळखू येणारा वास जाणवू लागला. वाटेवरची धूळ पायाला गार लागू लागली.

बघता-बघता काळोख नाहीसा झाला. दिसू लागले. झाडेझुडपे, दगडगोटे यांना आकार आला. चांदण्या दिसेनाशा झाल्या. रातकिड्यांचे गाणे थांबले. झोपेतून जाग्या झालेल्या कावळ्यांची जड कावकाव ऐकू आली.

तांबडा-पिवळा सूर्य माळाआडून वर आला. हिरवट प्रकाशाला पिवळी झळाळी आली. बोरींच्या झुडपात बसून राहिलेल्या सातबाया जाग्या झाल्या. शेपटी नाचवून कलकलू लागल्या. झुडपात पिसे फुलवून बसलेले होले पायांवर उभे राहून आवाज टाकू लागले. कावळे भराऱ्या घेऊ लागले.

माळावर वाळून पडलेले गवत सूर्याच्या पहिल्या किरणांनी उबदारले. त्याच्या खाली असलेले कीटकांचे जग जागे झाले. मुंग्या तुरतुरल्या, टोळ उड्या हाणू लागले. सरडे सरसरले. माळावर लहान गर्दी करून आत राहिलेले गुंडीकिडे, घसरून आत पडणाऱ्या किड्यांना पकडून खाण्यासाठी अंगावर माती घेऊन तयार राहिले. मुरमुट्याच्या बुंध्यावर बसून राहिलेले हिरव्या झगझगीत रंगाचे भुंगे मुरमुटीची तुरट पाने खाऊ लागले. माळावरच्या बिळांतून घोरपडींनी मुंडकी बाहेर काढली. गळ्याखालचा भाग हलवीत त्या जिभेच्या टप्प्यात येणाऱ्या कीटकांची वाट बघू लागल्या.

झाडे सोडून होले रस्त्यावर आले आणि डौलदार माना हलवीत धुळीत पडलेले गवताचे बी टिपू लागले. सपाट झालेल्या धुळीवर त्यांच्या पायांचे

ठसे नक्षीकाम केल्यासारखे उठू लागले.

पाठीशी असलेली पिशवी हातात घेऊन मी भराभर चालू लागलो. अनवाणी पायांनी धूळ उडवू लागलो. लेहंग्याच्या फडकफडक आवाजाने वाटेवरचे होले बावरून उंच उडू लागले. लांब टांगा टाकीत मी चालत राहिलो. चालून-चालून पोट खोल गेले. पिशवीतील भाकरींचा, लसणाच्या चटणीचा, सांडग्यांचा वास फार येऊ लागला; पण मी नेटाने पाय उचलीतच राहिलो. बोटांच्या फटीतून धूळ वर येत होती. पावलांवर पुटे चढत होती. लेहंगा मळत होता आणि वाट लांबतच होती.

आजूबाजूला पिवळ्या-करड्या रंगांचे माळ पसरले होते. पाहावे तिकडे उघडे माळ! अगोदर भगभगीत असलेले हे माळ उन्हाळ्यामुळे अधिक भगभगीत दिसत होते. क्वचित कुठे खोलगट भागांत झाडाझुडपांचे हिरवे ठिपके होते. एरवी चोहीकडे दगडगोट्यांनी भरलेले माळ. नेपती-बोराटीची, बाभळ-मुरमुटीची खुरटलेली झुडपे आणि त्यांमधून जाणारी, धुळीने भरलेली, दगडांनी उंचावलेली, कुठे रुंद तर कुठे अरुंद अशी गाडीवाट.

हळूहळू सूर्य वर चढला. पहाटे सौम्य वाटणारे माळरान रखरख करू लागले. सकाळच्या प्रहरी चाललेला पाखरांचा कलकलाट कमी झाला. क्वचित एखादी मातकट रंगाची माळचिमणी उंच उडून बाणासारखी खाली सूर घेऊ लागली. तिने घातलेल्या उतरत्या शिळेने उगीचच एकाकी वाटू लागले. एक बहिरीससाणा खाली बघत जमिनीबरोबर तरंगत गेला आणि कोकाट्यांनी ओरडून गोंधळ केला.

आता आसपास कुठे काळे, कुठे तांबडे असे जमिनीचे तुकडे नांगरून पडलेले दिसत होते. न नांगरलेल्या पडीक जमिनी उन्हाच्या तडाख्याने उलल्या होत्या. पिंढरीएवढा पाय जाईल अशा भेगा जागोजाग पडल्या होत्या. या जमिनी आल्या, त्याअर्थी वस्ती जवळ आली, असे समजून मी वरचेवर क्षितिजाकडे बघत होतो; पण घरे दिसत नव्हती. झाडी दिसत नव्हती.

उन्ह टळटळीत झाले. सकाळी गार काल्यासारखी लागणारी धूळ तापली. माझ्या डोक्याभोवती बारीक माश्यांचा एक थवा घोंघावू लागला. त्या सतत आवाजाने वीट आला. डोक्यावरची टोपी काढून तिथे तो पाठलाग करणारा घोळका हाकलण्याचा मी प्रयत्न केला; पण तो गेला नाही. शे-

दोनशे माश्या माझ्या डोक्याभोवती फिरत, बरोबर येतच राहिल्या. हा माणूस कुठेतरी अनेक माणसे राहणाऱ्या ठिकाणी चालला आहे, त्याला दिशा बरोबर माहीत आहे, त्याच्या सोबतीने गेलो तर आपण नेमक्या ठिकाणी पोहोचणार आहोत- घाण, राड, सांडपाणी असलेल्या ठिकाणी जाणार आहोत- हा समज असलेल्या माश्या डोक्याभोवती घोंगावत माझ्याबरोबर येतच राहिल्या.

आजूबाजूला सपाट मोकळा माळ, बाजरीची तांबडी राने, आणि मधेच गबाळे पडावे तशी पडलेली तीस-पस्तीस घरे, अशी बनगरवाडी होती. बहुतेक घरांच्या भिंती मातीच्या होत्या आणि छपरे खपलीच्या काडाने शाकारलेली होती. काही थोडी घरे धाब्याचीही होती. हरेक घरापुढे लहान-मोठे अंगण होते. सांडपाण्यावर वाढलेला लिंबारा, शेवगा होता. घराच्या मागच्या बाजूला मेंढरे कोंडण्यासाठी बाभळीच्या काट्यांचे कूड घालून केलेले वाडे होते. कुठे भिंतीला लागून गाडीचे मोडके चाक पडले होते. सगळे नेहमीप्रमाणेच. वाडीत रस्ते असे नव्हतेच. घरे बांधून उरलेली जागा चालण्यासाठी वापरली जात होती, इतकेच. बऱ्याच घरांच्या कवाडांना कुलपे होती. दोन-तीन लहान मुले एका घरापुढे खेळत होती. घरांच्या सावल्या धुळीने भरलेल्या वाटेवर पडल्या होत्या. त्यांत कुठे कुत्रे तर कुठे पांढरी-काळी कोंबडी डोळे मिटून बसली होती.

डावी-उजवीकडे घरे होती. त्यांतून बायांनी डोकावून बघितले. पोरे आत पळाली. थोडे पुढे गेल्यावर पटांगण लागले. लिंबाचे एक मोठे झाड लागले, त्याच्याभोवती पार होता. ती गार सावली बघताच, तापलेल्या कोंबड्यासारखा जाऊन मी तिच्यात बसलो. टोपी काढली. घाम पुसला. पाय आपटून धूळ झटकली. वरच्या थंड सावलीने घाम जिरला आणि बरे वाटले.

भूक लागली होती; पण पाणी कुठे आहे ते ठाऊक नव्हते. विचारावे असे कोणी आसपास दिसत नव्हते. तसेच तुकडे खावेत, असा विचार मनामध्ये आला; पण भुकेइतकीच तहानही लागली होती. तोंडातला ओलावा सुकून खारट चव आली होती. ती गार सावली सोडून उठावे, असेही वाटेना. उंच केलेल्या गुडघ्याभोवती हातांचा विळखा घालून मी उगीच बसून राहिलो. आसपास कसलाही आवाज नव्हता. माझ्या डोक्यावर असलेल्या एका फांदीवर कावळ्याचे जोडपे बसले होते तेसुद्धा आवाज करीत नव्हते.

जरा वेळाने, मी आलो त्याच वाटेने कुणी माणूस येताना दिसला. बरे

वाटले. हा माणूस येताच त्याला हाक मारावी, आपण का आलो ते सांगावे, पाणी विचारून घ्यावे, भाकरी खावी, असे मनाशी म्हणतो आहे, तोपर्यंत तो गडी गावात शिरला. समोर येऊन उभाही राहिला.

त्याच्या डोक्याला तांबड्या रंगाचा पटका होता. अंगात गोल सदरा होता. धोतराच्या टोकाबरोबरच एक उंच भालाही त्याने हातात धरला होता. त्याचा चेहरा मोठा आणि लांबोडका होता. गालाची हाडे वर आली होती. नाक सरळ होते. मिश्यांतले केस काळेकरडे होऊन धुरकटल्यासारखे दिसत होते. मुळीच संकोच न दाखविता त्याने आपल्या तांबारल्या डोळ्यांनी मला पाहून घेतले आणि मिश्यांवरून बोटे फिरवून धुळीत थुंक टाकली. ती मला तोंडावर आल्यासारखी वाटली. उगीच चुळबूळ करून मी पाय खाली सोडले आणि इकडे-तिकडे बघितले.

दम देताना काढावा तसा आवाज काढून त्याने मला विचारले, ''काय अंडीवाला हायेस का गा?''

त्या प्रश्नाने फटका बसल्यासारखा मी खाली आलो. क्षणभर काय उत्तर द्यावे हे मला सुधरेना. माझ्या या लेहंग्याने मला एकदम खाली ओढले होते. सुट्या आणेल्यांच्या थैल्या घेऊन खेडोपाडी अंडी खरीदणारा मुसलमान बनवून टाकले होते. मी गडबडलो. गोंधळलो. तोंडावर ओशाळवाणे हसू आले. सोडलेले पाय वर घेऊन टोपी नीट केली आणि म्हटले,

''नाही, मी मास्तर आहे.''

हा खुलासा ऐकून विचारणाऱ्याला आपण काही वावगे बोललो असे वाटले नाही. डाव्या पायावरचा भार उजव्या पायावर टाकून तो म्हणाला, ''मास्तर?''

त्याचा विश्वासच बसला नाही. मळका लेहंगा आणि रेघारेघांचा धुवट शर्ट घातलेले हे गुडघ्याएवढे पोर मास्तर कसे असेल? लंगोटी लावून ज्याने शाळेत जावे आणि थुंकीने पाटी पुसावी, अशा पोराला मास्तर म्हणेल कोण? जरी म्हणाले तरी त्याला मास्तर करील कोण? छे! काहीतरीच सांगणे!

मला आपल्या लहान वयाबद्दल, धोतर-कोट न घातल्याबद्दल विषाद वाटला. भाषेत जोर आणून मी म्हटले, ''हो. माझी नव्यानं नेमणूक झाली आहे. आजपासून मास्तर म्हणून मी इथं रुजू झालो आहे!''

हातात आडवा घेतलेला भाला त्याने झेंड्यासारखा समोर टेकला आणि तुच्छतेने म्हटले,

''हं, हतं काय करायचा गा मास्तर? साळा चालतीय कुटं हतं? पोरं हायती कुटं वाडीत? सरकारला काय ठावं न्हाई व्हय? रिक्कामा फाजीलपणा...''

आणि पटका नीट खोचीत तो निघूनही गेला. जाता-जाता पुन्हा एकवार धुळीत थुंकला. अरुंद गल्लीतून तो जाईपर्यंत मला तिकडे बघत राहण्याचे धैर्य झाले नाही. मी फार ओशाळलो. शाळेत फाटकी चड्डी घालून जाताना जसे मेल्याहून मेले व्हायचे तसे झाले. तेवढ्या एकाच प्रसंगाने माझे धैर्य, उमेद, उत्साह वितळून टाकला. असेच माघारी जावे आणि या नोकरीचा राजीनामा द्यावा, हे आपल्याला जमणार नाही, इथे शाळा भरणार नाही, मुले येणार नाहीत, मास्तराचा, शाळेचा, शिक्षणाचा इथे काही उपयोग नाही, असे मला वाटू लागले; आणि उदासवाणा चेहरा करून मी लिंबाच्या पारावर बसून राहिलो. मघा लागलेल्या तहानेचा, भुकेचा, काही वेळ मला विसर पडला. उन्हात तळपणाऱ्या त्या गावात या वेळी मी कशाला आलो, असे वाटून मला फार एकाकी वाटू लागले.

आणि मग, मिश्या पांढऱ्या झालेला एक म्हातारा हातातली काठी टेकीत रानाकडून आला. त्याच्या भुवयासुद्धा पांढऱ्या झाल्या होत्या. खांद्यावरचे जाडजूड कांबळे त्याने रुप्याचे कडे असलेल्या हातांनी बळकट धरले होते. जोड्यांतले पाय ओढीत-ओढीत तो आला. माझ्यापुढे थांबला. कपाळावर हात घेऊन त्याने मला न्याहाळले, खाणाखुणा पटण्यासाठी चुकले मेंढरू न्याहाळावे तसे न्याहाळले. म्हटले,

''हतं का बसला रे बाळा?''

मी म्हणालो, ''मी मास्तर आहे. आजपासून माझी नेमणूक इथं झाली आहे.''

''अरे, मग मास्तर असून हतं का बसतूस? शाळंत बस.''

म्हाताऱ्याच्या या बोलण्याने मला थोडा धीर आला. मघाच्या भालाइतासारखा हा नाही असे वाटले.

''मला शाळेची इमारत कुठाय तेही नीट ठाऊक नाही!''

यावर समोरच्या लांबलचक चावडीकडे हातातली काठी करून म्हातारा म्हणाला, ‘‘ती नव्हं का शाळा–चावडीतलं दोन खण शाळंचं!’’

‘‘ही?’’

‘‘हां. जा बस ततं!’’

‘‘एकटा बसून काय करू? पोरं कुठं आहेत?’’

‘‘पोरं गेली गा शेरडांमागं. पर येत्याली. काय रानातच ऱ्हात्यात?’’

‘‘पण शाळा भरण्याइतकी आहेत तरी का?’’

‘‘हायेत, बक्कळ हायेत. आन् हुत्याल की. दरसाल दहा-ईस लगीन उभं ऱ्हातंय. पोरं हुत्याल. तू शिकवायचं काम कर म्हंजे झालं.’’

त्या बोलण्याचे हसू आले. पाराखाली उडी टाकून मी पिशवी घेतली आणि म्हटले, ‘‘मला पाणी कुठाय ते सांगा, म्हणजे जेवण करीन. भाकरी आणल्यात बरोबर.’’

म्हातारा म्हणाला, ‘‘पाण्याची वरड हाय गा वाडीला. उन्हाळ्यात पार वाळवण हुतं. एक हेळ हाय त्यो तिकडं बग–’’

मी गल्लीतून समोर पाहिले. गावाबाहेर दगडचुन्याने बांधलेला हेळ दिसला.

‘‘आमच्या धनगराचं पानी चालत असलं तर बग, देतो.’’

मी म्हणालो, ‘‘न चालायला काय झालं? पण तांब्या मिळाला तर मी घेऊन येईन.’’

पण, म्हाताऱ्याने तिथे उभ्या राहिल्याच हाक मारली, ‘‘अग ये अंजे, पान्याचा तांब्या आन भरून मास्तराला.’’

लांब, गल्लीतून एका घरातून कुणीसे बाईमाणूस डोकावले. म्हाताऱ्याने परत ओरडून तेच सांगितले आणि मग आम्ही दोघेही शाळेपाशी आलो. तालुक्याच्या मास्तरांनी माझ्यापाशी चावी दिली होती. ते म्हणाले होते,

‘‘चार्ज देण्यासारखं काही काम नाही. पोरंच नाहीत तिथं तर शाळा कसली? ही चावी घेऊन जा आणि चार्ज दिला म्हणून मी रिपोर्ट करतो.’’

कुलूप काढून मी शाळा उघडली. कुबट भपकारा आला. खालची उंचसखल जमीन उखणली होती. धुळीने आणि चिमण्यांच्या पांढऱ्या विष्ठेने भरून गेली होती.

खांद्यावरचे घोंगडे काढून म्हाताऱ्याने त्यानेच तो कचरा लोटला, तो आम्हा दोघांच्याही अंगावर आला. त्या खाटाने मला ठसका लागला.

थोडीशी जागा स्वच्छ झाल्यावर, त्यावर म्हाताऱ्याने घोंगडे टाकले. अंथरले नाही, तसेच आपले टाकले, आणि म्हटले,

''बस.''

आणि मग हात खाली टेकून तोही बसला. काठी बाजूला आडवी ठेवीत म्हणाला, ''हां, सोड भाकरी. पानी आनील आत्ता पोरगी!''

मी पिशवी घेतली. जुन्या धोतराच्या फडक्यात बांधलेल्या भाकरी सोडल्या.

''तुम्ही खाता का बाबा?''

आपला सुरकुतला चेहरा हसरा करून म्हातारा म्हणाला, ''आमी आतापातूर ऱ्हातू व्हय? दोन बार होऊन तिसरा वखत आला. खा तू!''

मला थोडे संकोचल्यासारखे झाले; पण भूक संकोचाला जुमानणारी नव्हती.


कुणीतरी एक काळीभोर पोरगी आली. बाहेरूनच तिने उंबरठ्यात पाण्याचा तांब्या ठेवला आणि माझ्याकडे थोडे बघून ती निघून गेली.

एक गुडघा उभा करून बसलेला म्हातारा कमरेची तमाखूची पिशवी काढून तीत बोटे घालू लागला.

भुकेल्या पोटी मी भराभर घास घेत राहिलो. घेता-घेता त्या म्हाताऱ्याकडे पाहू लागलो. डोक्याचे मुंडासे सोडले, अर्धे धोतर सोडले, तर त्याच्या अंगावर काही नव्हते. ज्या मातीत तो दिवसभर मेंढरांमागे हिंडत असेल त्या मातीप्रमाणे, त्या मेंढरांप्रमाणे त्याचाही रंग काळाभोर होता. अंगकाठी सडसडीत होती. उघड्या पायांवर झाडेझुडपे लागून पांढरेधोट फरकाटे उठले होते. आणि म्हातारा फार पिकला होता. कबुतराच्या पिसाऱ्यासारख्या भुवया, पांढऱ्याघोट भरघोस मिशा, बोटबोट वाढलेली पांढरी दाढी आणि छातीवरचे पांढरे कुरळे केस. वयाचा अंदाज बांधणे कठीण होते; पण म्हातारा पार थकला होता. चेहऱ्यावर सुरकुत्यांचे जाळे होते. हातापायावरच्या शिरा फुगल्या होत्या, जागजागी गाठळल्या होत्या.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## धर्म... कबीरांच्या मनातला

**ओशो**

अनुवाद
**प्रज्ञा ओक**

पृष्ठे : १५६
किंमत : २५०

*कबीरांच्या दोह्यांतील आध्यात्मिक अन्वय उलगडणारी ओशोंची चिंतनशील प्रवचने*

साधारण एक हजार वर्षांपूर्वी ‘तिब्बत’च्या आश्रमात एक प्रसंग घडला. त्या प्रसंगातून आपण कबीरांना समजून घेऊ. हा मुख्य आश्रम खूपच भव्य असा होता. याच आश्रमाने ‘तिब्बत’च्या सीमेवर आणखी एक छोटा आश्रम बांधला होता. आश्रम बांधून पूर्ण झाल्यानंतर बातमी आली की, आता सगळी तयारी झाली आहे; आश्रमात ‘गुरुपद’ सांभाळण्यासाठी कुणा एखाद्या संन्याशाला आता पाठवायला हवं.

मुख्य आश्रमाच्या गुरूंनी दहा जणांना निवडलं आणि तिकडे पाठवून दिलं. मुख्य आश्रमात जवळजवळ एक हजार संन्यासी होते. त्या सर्वांना नवल वाटलं. असं कसं झालं? फक्त एकालाच बोलावणं होतं, तर गुरूंनी दहा जणांना कसं काय पाठवलं? उत्सुकता अगदी पराकोटीला गेली. काही जण गुरूकडे गेले आणि त्यांना विचारलं, ''गुरू, आम्हाला अर्थबोध झाला नाही. कारण एकाला कुणाला तरी बोलावलं होतं आणि तुम्ही दहा जणांना कसं काय पाठवलंत? काय अर्थ आहे याचा?'' गुरू म्हणाले, ''थांबा, जरा धीर धरा. ते दहा जण तिकडे पोहोचल्यानंतर तुम्हाला आपोआप कळेल.''

तीन आठवडे गेले. प्रवास फारच लांबचा होता. अवघड होता. मोठमोठे पर्वत चढायचे होते. पायी चालायचं होतं. तीन आठवड्यांनंतर तिकडून निरोप आला की, आपण एक संन्यासी पाठवला होतात तो पोहोचलाय. आता आणखीनच मोठी अडचण उभी राहिली. सगळ्या आश्रमात चर्चेला उधाण आलं. हे काय रहस्य आहे? दहा पाठवले होते; एकच कसा काय पोहोचला? गुरूंना विचारले. ते उद्गारले, ''दहा पाठवाल तेव्हा एखादा पोहोचतो; असंच असतं.''

नंतर संपूर्ण घटना कळली. दहा जण निघाले तेव्हा वाटेमध्ये एक गाव लागलं. सकाळीसकाळी गावच्या वेशीवर पहिलाच संन्यासी पाहिल्यानंतर एका माणसानं त्याचे पायच धरले. म्हणाला, ''ज्योतिष्यांनी सांगितलंय की, उद्या सकाळी जो माणूस पहिल्यांदा गावात प्रवेश करेल, त्याच्याबरोबर मुलीचं लग्न करून टाक. माझ्याजवळ बरंच धन आहे. एकुलती एक मुलगी आहे. ते सगळं तिचंच आहे. तेव्हा तुम्ही माझे जावई व्हा. ज्योतिष्यानं असंही सांगितलंय की, पहिला माणूस नाही म्हणाला, तर दुसऱ्या माणसाशी तिचं लग्न कर. दुसरा नाही म्हणाला, तर तिसरा... इथेतर तुम्ही एकदम दहा जण हजर आहात. माझा प्रश्नच सुटला.''

पहिलाच संन्यासी एकदम तयार झाला; कारण मुलगी खूप सुंदर होती. शिवाय धनसंपत्तीही अमाप होती. तेव्हा पहिला आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला, ''परमेश्वराची इच्छा हीच असेल. माझं काही आता पुढे जाणं होणार नाही. मी येत नाही तुमच्याबरोबर.''

दुसऱ्या गावात उरलेले नऊ जण पोहोचले, तर कळलं की गावचा जो राजा होता, त्याचा राजपुरोहित नुकताच मरण पावला होता. राजाला दुसऱ्या

राजपुरोहिताची गरज होती. तो शोधतच होता. नोकरी तर चांगलीच होती, इतरही मानसन्मान होता. शिवाय कामही फारसं नव्हतं. झालं... एक संन्यासी तिथे थांबला. असे एकेक करत आठ जण गेले. दोघंच राहिले होते.

आता आश्रम फक्त दहा मैलांवर राहिला होता. एका गावात ते दोघे संध्याकाळी थांबले. गावानं एक प्रवचन आयोजित केलेलं होतं. त्यांतला एक संन्यासी बोलायला उभा राहिला. प्रवचन करताकरता मध्येच एक नास्तिक माणूस उठून उभा राहिला आणि म्हणाला, ''ही सगळी बकवास आहे. हे बुद्ध आणि बुद्धाची ही वचनं सगळं कवडीमोल आहे, शुद्ध कचरा आहे सगळा. यात काहीही अर्थ नाही.'' संन्याशानं आपल्या दुसऱ्या सहकारी संन्याशाला सांगितलं, ''मी इथंच थांबतोय. या नास्तिकाला जोपर्यंत मी पूर्णपणे आस्तिक बनवत नाही; तोपर्यंत हे गाव मी सोडणार नाही.''

अशा तऱ्हेनं त्या आश्रमापर्यंत फक्त एकच पोहोचला. दहा जण निघतात; पण एखादाच पोहोचतो.

या प्रसंगानंतर 'तिब्बत'मध्ये एक म्हण प्रचलित झाली; ती म्हणजे,

'दहा निघतात, एक पोहोचतो.' म्हणूनच हा सगळा संसाराचा मार्ग काट्याकुट्यांनी भरलेला असतो. मोहाची ठिकाणं खूप असतात. ठिकठिकाणी थांबण्याचे प्रसंग येतात. येणारा मार्ग चढाईचा असतो. एकेक पाऊल उचलताना प्रचंड श्रम आणि अतीव निष्ठा आवश्यक होऊन बसते. खाली उतरण्याचा मार्ग नसतोच. खाली पडण्याची क्षणोक्षणी भीती असते. अत्यंत सूक्ष्म अशी कारणंही तुमच्या पतनाला कारणीभूत ठरू शकतात. म्हणूनच दहा जणांतला एखादा पोहोचला; तरीही खूप झालं.

इजिप्तमध्ये म्हणतात की, 'हजारांना बोलावलं तर एक येऊ शकतो. एकाचीच निवड होऊ शकते.' मला तर वाटतं, 'तिब्बत'च्या म्हणीपेक्षा ही म्हण जास्त योग्य आहे. दहा जणांतला एक पोहोचणसुद्धा खरं पाहता शक्य नाही; हजारांतलाच एखादा पोहोचणं शक्य आहे.

जीझसला कुणीतरी विचारलं, ''तुमच्या प्रभूचं राज्य कसं आहे?'' जीझसनं उत्तर दिलं, ''मासेमारीच्या कोळ्याच्या जाळ्यासारखं आहे.'' कोळी जाळं फेकतो, शेकडो मासे त्यात अडकतात; पण त्यांतले खाण्यायोग्य मासेच ठेवले जातात. बाकीचे परत पाण्यात फेकले जातात. जीझसच्या म्हणण्याप्रमाणे परमात्मा जाळं फेकतो; लाखो जण त्यात अडकतात. त्यांतले काही

विशेष तयार असलेलेच निवडले जातात. बाकीचे सगळे पुन्हा पाण्यात फेकले जातात.

पाणी म्हणजे संसार!

या प्रकारे वारंवार तुम्ही या संसारसागरात फेकले जाता. असं नाही की, तुम्ही कधीच जाळ्यात सापडला नाहीत. अनेक वेळा या परमेश्वराच्या जाळ्यात तुम्ही अडकला आहात; परंतु निवड होण्यायोग्य तुम्ही नाहीतच. म्हणून पुन:पुन्हा फेकले जाता. जाळ्यामध्ये तुम्ही सापडता; कारण जाळं तुमच्यावर टाकलं जातं. परंतु निवड तो कोळीच करणार ना? कोळी म्हणजे परमात्मा! पण तुम्ही निवडले जात नाही. हजारो वेळा या जाळ्यात अडकता, असंख्य वेळा संन्यास घेता, असंख्य वेळा घर सोडता, असंख्य वेळा भिक्षू बनता, कितीतरी वेळा संकल्प सोडता, कितीतरी व्रतं करता, कितीतरी उपास करता. तुमच्या असंख्य जन्मांच्या असंख्य कथा आहेत. परंतु एक गोष्ट खरी की, असंख्य वेळा या जाळ्यात अडकूनसुद्धा तुमची निवड होत नाही. तुम्ही फेकले जाता. निवड होण्यासाठी पात्रता लागते. त्यासाठी आतून बळ लागतं, वेगळी ऊर्जा लागते. ही पात्रता मिळवण्याचा मार्ग फारफार कठीण आहे. या संसारात तुम्ही काहीही मिळवू शकता; काहीही फारसं न करता मिळवू शकता. परंतु परमात्म्याला मिळवणं फार कठीण आहे. कारण तुम्ही जसे आहात, तसे त्याला मिळवू शकत नाही. त्यासाठी तुम्हाला स्वत:ला बदलावं लागतं. हा बदल म्हणजे तुम्हाला स्वत:ला परमात्म्यासारखं थोडंफार व्हावं लागतं; तेव्हाच त्याची प्राप्ती होऊ शकते. त्याच्यासारखं नसताना त्याची प्राप्ती होणं कसं शक्य आहे? काहीतरी समान पाहिजे ना; तरच पूल बांधता येईल. सूर्याचा एखादा तरी किरण तुमच्यात असेल, तर त्यायोगे तुम्ही सूर्यापर्यंतचा प्रवास करू शकाल. आपण दुधापासून दही बनवतो. त्यासाठी दुधात थोडं दही टाकावं लागतं आणि त्यानंतरच सर्व दुधाचं दही बनतं. म्हणूनच थोडातरी परमात्म्याचा अंश तुमच्यात असेल, तरच तुमचं पूर्ण दूध हे दही बनू शकतं. आणि एवढासासुद्धा अंश नसेल, तर हा प्रवास कठीण आहे आणि हीच तर अडचण आहे. कारण तो 'एवढासा' अंश असण्यासाठी तुम्हाला तुमच्यात प्रचंड बदल करावे लागतात. तुमच्या संपूर्ण आयुष्याची रीत, पद्धत बदलावी लागते; रूपांतरित करावी लागते. म्हणूनच कबीर म्हणतात, 'तेरा जन एकाध है कोई।' अशी करोडो माणसं आहेत, मंदिरं आहेत, मशिदी आहेत, गुरुद्वारे

आहेत; तिथे लोक प्रार्थना करतात, पूजाअर्चा करतात; परंतु 'तेरा जन एकाध है कोई।'

एवढी मोठी पृथ्वी! अब्जावधी लोक आहेत. मंदिरांची कमतरता नाही. प्रार्थना, पूजा अमाप चाललीये. धूप जाळला जातोय, दिवे उजळवले जातायत; पण या सगळ्यांत आत्मा नाही. बाहेरच्या मंदिरात पूजा चाललीये, पण आतल्या मंदिरात त्याचा एवढाही आवाज नाहीये. बाहेर मोठी सजावट आहे; पण आतल्या मंदिरात काहीही नाही. सगळं रिकामं आहे. म्हणूनच कितीही मंदिरं पालथी घाला; पण त्याच्यापर्यंत 'पोहोचणार' कधीच नाही. कारण त्याचं मंदिर हे दगड-मातीचं नाहीये तर ते चैतन्याचं मंदिर आहे. ते मंदिर कुणी माणूस बनवत नसतो. उलट, याच्या अगदी विरुद्ध गोष्ट असते. ती म्हणजे तोच 'माणसाला' बनवत असतो. माणूस 'त्याची' देवळं बनवून कुणाला फसवत असतो? तुम्ही बनवलेल्या मंदिरातून तुम्ही 'त्याच्यापर्यंत' कधीच पोहोचणार नाही; कारण तुम्ही निर्माण केलेली गोष्ट तुमच्यापेक्षा लहानच असणार ना? गणित स्वच्छ आहे; कारण तुमची निर्मिती तुमच्यापेक्षा मोठी कशी असणार? निर्माणकर्त्यापेक्षा त्याची निर्मिती मोठी असू शकत नाही. उदाहरणार्थ, एखादी कविता कितीही सुंदर असो; परंतु ती कवीपेक्षा मोठी निश्चितच नाही. संगीत कितीही मधुर असो; पण ते गायकापेक्षा, संगीततज्ज्ञापेक्षा मोठं निश्चित नाही. मूळ मूर्ती कितीही सुंदर असो; पण ती मूर्तिकारापेक्षा मोठी नाही. बनवणारा नेहमी त्याच्या कलाकृतींपेक्षा मोठाच असणार; कारण अजूनही त्याच्यात बरंच काही शिल्लक आहे. यापेक्षा चांगलं तो काही बनवू शकतो. एखाद्या गायकानं एखादं गीत सुंदर गायलं असेलही; परंतु तो आणखीही सुंदर गाणी गाऊ शकतो. त्यामुळेच गायकापेक्षा गाणं मोठं होऊ शकत नाही. तसंच तुम्ही बनवलेली मंदिरं तुमच्यापेक्षा मोठी होऊच शकत नाहीत. तुम्ही बनवलेली परमात्म्याची प्रतिमा तुमच्यापेक्षा लहानच असणार; कारण तुम्ही त्याचे कर्ते आहात. तुमच्यातला क्रोध, कामवासना, लोभ, माया, मोह हे सगळं सगळं तुमच्या निर्मितीत निश्चितच येणार, मूर्तीमध्ये येणार; कारण तुमच्या हाताच्या स्पर्शानंच तर तिची निर्मिती होणार ना? तुमच्या हाताचं विष या मूर्तीत उतरणार, म्हणूनच तुम्ही बनवलेली मंदिरं तुमच्यापेक्षा मोठी, महान असणार नाहीत. तुमचं मन जर का वेश्यालयाभोवती घुटमळत असेल, तर तुमची निर्मिती, तुमची मंदिरं वेश्यालयासारखीच होणार.

तुम्ही जसे असाल, तशीच तुमची सावली त्यात असणार. तुमचेच स्वर त्यात गुंजणार. म्हणूनच मंदिरं, मशिदी, चर्च ही नावापुरती परमात्म्याची आहेत; पण बनावट तर माणसाचीच आहे आणि म्हणूनच जगात आत्तापर्यंत विध्वंस झाले आहेत, ते जास्तीत जास्त मंदिरांचे. बाकी इतर कशाचेही नाहीत. मंदिरांनी, मशिदींनी माणसांच्यात लढाया लावल्या; कारण माणसातली हिंसा त्यात उतरली आहे. म्हणूनच मंदिरं, मशिदींनी माणसं जोडण्याचं काम केलेलं नसून, तोडण्याचं केलेलं आहे, याचं कारण स्पष्ट आहे. ज्यानं ते सारं बनवलंय त्याच्यातली हिंसा, घृणा, आक्रमणाची प्रवृत्ती, दुष्टपणा, क्रौर्य हे सारंसारं त्यात उतरलेलं आहे.

तुमच्या मंदिरातून तुम्ही पूजा कोणाची करता, तर तुमची स्वत:ची पूजा करता. कारण ही मंदिरं म्हणजे तुमचेच आरसे आहेत. त्यात तुमचीच प्रतिमा दिसणार. म्हणूनच मंदिर-मशिदीत तुम्ही ईश्वराला कितीही शोधण्याचा प्रयत्न करा; पण तिथपर्यंत तुम्ही कधीच पोहोचणार नाही. तुम्हाला परमात्म्याला शोधायचं असेल, तर तुम्हाला असं मंदिर शोधावं लागेल, की जे 'त्यानं' निर्माण केलंय. ते मंदिर म्हणजे तुम्ही स्वत: आहात. म्हणूनच कबीर म्हणतात, 'कस्तुरी कुंडल बसै।' कस्तुरीमृग तुम्हाला माहीत आहेच. हरणाच्या नाभीमध्ये कस्तुरी तयार होते. तिचा सुगंध हा मादीला आकर्षित करण्यासाठी असतो. जेव्हा मृगनर कामातुर होतो, तेव्हा त्याच्या शरीरातून एक प्रकारचा सुगंध यायला सुरुवात होते. हा वास अत्यंत मादक असतो. कस्तुरीसारखा सुगंध जगात कुठेच नाही. अतिशय सुंदर आणि चुंबकशक्ती असणारा हा सुगंध असतो. त्या सुगंधानं मादीसुद्धा कामातुर होते, वेडीपिशी होते, स्वत:ला विसरून जाते. हे सगळं निसर्गनियमाप्रमाणे ठीकच आहे. निसर्गाची ती व्यवस्थाच आहे. नर-मादी या चुंबकीय आकर्षणानं एकमेकांशी बांधले जावेत, अशी ही व्यवस्था आहे.

मोर नाचत असतो, पिसारा फुलवून! तो पिसारा, त्यातले मोहक रंग मादीला आकर्षित करतात. त्याचं नृत्य, त्याचा दिमाख तिला आकर्षित करतो. कोकीळ गातो. त्यामुळे कोकिळा आकर्षित होते. त्या स्वरामध्ये मादीला आवाहन असतं. ते मादीला बांधून ठेवतं. असंच कस्तुरीमृगाचं आहे. नराच्या नाभीमध्ये कस्तुरी बनते. एखाद्या मदिरेसारखा झिंग आणणारा वास त्याला असतो. त्या वासामुळे मादी वेडीपिशी होते आणि स्वत:ला समर्पित

करते. इथपर्यंत सगळं ठीक आहे. यात अडचण पुढे आहे. हा जो वेडं करणारा वास आहे, तो त्या नरालासुद्धा येतो. मोर नाचतो; परंतु आपला पिसारा तो पाहू शकत नाही. कोकिळाला माहीत असतं, हा आवाज माझा आहे म्हणून. परंतु मृगनराला हा सुगंध आपल्यातून येतोय, हे माहीतच नसतं. मादी त्या वासानं वेडी होते, तसा नरही वेडा होतो आणि हा वास कुठून येतोय, याचा माग काढत फिरत राहतो. सगळीकडे फिरतो. सगळीकडे तोच सुवास. त्याला पत्ताच लागत नाही. झाडाझुडपांत, जंगलात नुसता फिरत राहतो, वेडापिसा होतो; परंतु हा सुवास त्याच्याच नाभीतून स्रवत असतो. 'कस्तुरी कुंडल बसै।'

कबीरांनी हे फारच लोभसवाणं प्रतीक निवडलंय. ज्या मंदिराचा तुम्ही शोध घेताय, ते तुमच्यामध्येच आहे. नव्हे, ते मंदिर म्हणजे तुम्हीच आहात. परमात्म्याची जी मूर्ती तुम्ही बनवताय, ती तुम्ही स्वत:च आहात. तुमच्या 'आत'मध्ये जळणारा त्याचा तो दिवा... त्याची प्रकाशमान ज्योत तुमच्या अंतरंगात तेवते आहे. तुम्ही भलेही वरून मातीचे दिवे असाल; परंतु आतून मात्र तुम्ही चिद्स्वरूप आहात, चैतन्यस्वरूप आहात. तुमचा देह मृण्मयी आहे; परंतु तुमचं अंत:स्वरूप चिन्मयी आहे. बाहेरून मातीचा दिवा भलेही असाल; ज्योत तर मातीची नाही ना? दिवा पृथ्वीस्वरूप आहे; पण ज्योत आकाशाची आहे. दिवा संसाररूपी आहे; पण ज्योत परमात्म्याची आहे.

परंतु तुमची स्थिती त्या मृगनरासारखी आहे. त्या परमात्माप्राप्तीसाठी तुम्ही अखंड फिरत राहता, शोधत राहता. जन्मोजन्मी हा शोध चालूच असतो. कुणासाठी? कुणाचा? तर जे 'तुमच्यात' आहे, त्याचाच शोध तुमचा चालू आहे. उलट, त्यापासून तुम्ही जास्तच दूर जाताय. मग त्या कस्तुरीमृगासारखं वेडं व्हायला होईलच. जितका शोध तितक्या अडचणी वाढणार. कारण कुठेही शोधा, जग पालथं घाला, आयुष्यभर भटकत राहा; कधीच प्राप्ती होणार नाही. कारण आरंभालाच मोठी चूक झाली आहे. जे 'आत' आहे ते तुम्हाला बाहेर वाटतंय. कारण सुगंध बाहेरून येतोय ना! तो 'बाहेरून' येतोय ही समजूतच चुकीची आहे.


तुमच्या बाबतीत 'आनंद' या गोष्टीबद्दल असंच म्हणता येईल. तुम्हीसुद्धा आनंदाचा गंध बाहेरून येतोय, असं गृहीत धरता. कधी एखाद्या स्त्रीच्या सहवासानं तुम्हाला आनंद मिळतो, कधी बासरीच्या सुरातून, कधी सुंदर भोजनातून, कधी मोठ्या पदावर असण्यातून, कधी संपत्तीच्या खणखणाटातून,

तर कधी चक्क अहंकारातूनही तुम्हाला आनंद मिळतो. हा संसार म्हणजे भलंमोठं जंगल आहे. प्रत्येक झाडावर तुम्ही डोकं आपटून घेतलंय. कधी इथं तर कधी तिथं! कुठे ना कुठे तरी एखादी झलक मिळतेच. ती झलक का मिळते? तर कस्तुरी कुंडल बसै । जिथे कुठे जाल, तिथे झलक मिळते.

हे सारं जरा कठीण आहे. एखाद्या स्त्रीच्या सहवासातून आनंद मिळाला असं जेव्हा तुम्ही म्हणता, तेव्हा ते कस्तुरीमृगासारखं असतं. कसं? तर 'आनंद' हा तुमच्या स्वत:तूनच तुम्हाला मिळत असतो. कारण उद्या तुमचंच मन बदलेल आणि त्या स्त्रीच्या सहवासातून आनंद मिळणार नाही. उद्या याच स्त्रीपासून तुम्ही दूर पळण्याचं बघाल. आज सगळं सर्वस्व तिच्यावर ओवाळून टाकावंसं वाटेल आणि उद्या तिचं तोंडही पाहू नयेसं वाटेल. म्हणजेच अर्थ स्पष्ट आहे– जर समजा, आनंद त्या स्त्रीपासूनच मिळत असेल, तर तो कायमचा मिळायला हवा ना? पण तसं होत नाही; कारण तुमच्या 'मनावर' तो अवलंबून आहे. म्हणजे मूळ आनंदाचा अनुभव हा तुमच्यातूनच आलेला आहे. तुमच्या 'आतून' जो आकर्षणाचा गंध निर्माण झाला होता, तोच त्या स्त्रीमध्ये तुम्हाला प्रतीत झाला. असंच सगळं धनसंग्रहात, अहंकारात, पदप्रतिष्ठेत होत असतं. तुमच्या 'आतून' आलेला गंध किंवा प्रेम म्हणा, आसक्ती म्हणा, त्या समोरच्या गोष्टीत प्रतीत होत असते.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# अकबर ऑफ हिंदुस्थान

**पार्वती शर्मा**

अनुवाद

**प्रशांत तळणीकर**

पृष्ठे : ४४०
किंमत : ६६०

*उत्तम योद्धा, महान प्रशासक, अनेकतत्त्ववादाचा पुरस्कर्ता असलेल्या अकबराच्या समग्र जीवनकालाचा यथासांग पट मांडणारे चरित्र*

*'कर्तव्यपूर्ण आज्ञाधारकतेची पहिली पातळी म्हणजे परीक्षा पाहणारे क्षण आल्यावर भुवया आक्रसून कपाळावर आठ्या आणणे ही नव्हे; तर त्यांच्याकडे वैद्याने दिलेली कडू औषधे म्हणून पाहणे आणि त्यांना हसऱ्या चेहऱ्याने स्वीकारणे ही होय.'*

- अकबर, आईन-इ-अकबरीमधील सकारात्मक म्हणी

युरोपियन वेल्वेट आणि तुर्की जरीच्या कापडाच्या

झूलींनी, आणि तिला लटकलेल्या सोन्या-चांदीच्या साखळ्यांनी असे सजवलेले पाच हजार हत्ती फतेहपूरच्या नव्यानेच बांधलेल्या दगडी राजवाड्यांच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभे होते. लखलखणाऱ्या अंगांच्या या प्रत्येक दोन हत्तींच्या मध्ये एका चबुतऱ्यावर एक चित्ता बसलेला होता. त्याच्याही गळ्यात असाच रत्नजडित सोन्याचा पट्टा आणि अंगावर उंची कापड होते. सोन्याचे खोगीर घातलेले अरबी आणि इराणी जातिवंत घोडेदेखील या नयनरम्य दृश्याचा भाग होते आणि हे कुणाला कमी वाटेल की काय म्हणून सोन्याचे नक्षीकाम केलेल्या बैलगाड्याही तिथे उभ्या होत्या.

राजवाड्यांच्या इमारतीदेखील सुंदर सजवलेल्या होत्या आणि संपूर्ण शहरातच एक उत्सवी वातावरण होते. आणि ते योग्यही होते. ही अकबराची विजयनगरी होती. शहराची पायाभरणी होऊन जेमतेम तीनच वर्षे झाली असताना अकबराने फतेहपूरहून मोहिमा काढून एकीकडे गुजरात तर दुसरीकडे फतेहपूरच्या पूर्वेला नदीमार्गे जाऊन बिहार फत्ते केले होते. आपल्या अर्ध्या शतकाच्या राजवटीची फक्त दोनच दशके झालेली असताना अकबराचा हिंदुस्थान या भागातली, किंबहुना अवघ्या जगातली एक प्रमुख शक्ती म्हणून उदयाला येत होता. इराण आणि तुराणच्या राजांनी आपल्या या दिवसेंदिवस बलिष्ठ होत चाललेल्या शेजारी राष्ट्रामध्ये आपापले राजदूत पाठवले होते. गोवा, दमण आणि दीवमधले पोर्तुगीज नरम झाले होते आणि अकबर ज्या तीव्र गतीने आपल्या राज्याचा विस्तार करत होता[१] त्याने दबकलेल्या दख्खनी राजांप्रमाणेच त्यांची स्थिती झाली होती.

मात्र दागिन्यांनी मढलेले हत्ती, रत्नांनी सजवलेले चित्ते आणि ऑक्टोबर महिन्याच्या कडक उन्हामध्ये चमचम करणारे ते अगणित सोने अकबराच्या आणखी एका लष्करी यशाच्या सन्मानार्थ किंवा कुठल्या राज्याच्या राजदूताला दिपवण्याकरता नव्हते. हा सर्व सरंजाम त्यापेक्षा खूपच सामान्य - किंवा खरे तर निकृष्ट दर्जाच्या - व्यक्तीकरता करण्यात आला होता. ही व्यक्ती म्हणजे नुकताच पत्नीवियोग झालेला बदखशांचा माजी राज्यकर्ता होता. गेली दोन दशके या मनुष्याने अकबराच्या तुलनेत अगदीच 'किरकोळ महत्त्वाकांक्षा'[२] बाळगत आणि त्याच्यापेक्षा खूपच अनुत्पादक प्रकारे घालवलेली होती आणि त्यातही त्याला फारसे यश मिळाले नव्हते. अखेर त्याच्याच

नातवाने[३] त्याला त्याच्या 'डोंगराळ जन्मभूमीतून' हाकलून लावले होते. अशा या अपयशी आणि अगतिक मनुष्याला अकबराच्या अमीरउमरावांनी सिंधू नदीच्या तटापासून ते राजधानीपर्यंत अतिशय सन्मानाने आणले होते. राजधानीमध्ये त्याचे जे भव्यदिव्य स्वागत झाले त्यामुळे तो बिचारा मनुष्य इतका भारावून गेला होता की, अकबराचे दर्शन होताच तो आपल्या घोड्यावरून उडी मारून उतरला आणि धावतच बादशहाकडे जाऊन त्याच्या पाया पडू लागला.

आपल्या पाहुण्याला अभिवादन करण्याकरता अकबरदेखील घोड्यावरून पायउतार झाला. तुरळक दाढी आणि बहुधा लालसर गोरा रंग अशी मध्य आशियाई वैशिष्ट्ये असलेला तो वृद्ध मनुष्य अकबराचा चुलता होता. त्याचे नाव होते मिर्झा[४] सुलेमान. अकबराच्या कारकिर्दीच्या अगदी सुरुवातीलाच ज्या पिढीच्या चुलत्यांनी त्याला शक्य तितका त्रास दिला होता, त्या पिढीचा हा चुलता प्रतिनिधी होता आणि आता अकबराचा विलक्षण उत्कर्ष होताना पाहायला जिवंत असणारा शेवटचा होता. सगळा डामडौल, सगळी चमकदमक ही त्याला दाखवण्याकरता होती कारण आपल्या आप्तस्वकीयांसमोर दाखवता येत नसेल, तर जगातले कितीही मोठे यश काय कामाचे?

सुलेमान खरोखरच भारावून गेला होता हे पाहून अकबराला खूप समाधान वाटत होते आणि राजेपणातही आपला सुसंस्कृतपणा सांभाळत तो या वयस्कर नातेवाईकाशी प्रेमळपणे बोलत होता. त्याच्यासाठी त्याने मेजवानीचे आयोजन केले व त्याचे राज्य परत मिळवण्याकरता त्याला लष्करी मदतीचे आश्वासनही दिले. हे चुलता-पुतण्या किमान वीस वर्षांनी भेटत होते आणि त्यांच्यातील संभाषण गतैतिहासाकडे वळले असल्यास नवल नाही. सुलेमानला अकबराच्या दरबाराची शान, तिथल्या बगिच्यांचे आणि इमारतींचे देखणेपण, अन्नाची आणि पेयांची रेलचेल या गोष्टींचे नक्कीच नवल वाटले असणार, तसेच याआधी तो हिंदुस्थानात आला होता, त्यानंतर सगळे काही किती बदलले आहे हे पाहूनही तो आश्चर्यचकित झाला.

ही गोष्ट जवळजवळ अर्ध्या शतकापूर्वीची होती. तेव्हा तरुण आणि आनंदात असलेला सुलेमान १५२६ मध्ये पानिपतच्या रणांगणामध्ये इब्राहिम लोदीशी लढलेल्या छोट्या फौजेचा एक भाग होता. या युद्धामुळे त्याचा

स्वत:चा चुलता बाबर याला उत्तर हिंदुस्थानामध्ये आपले पाय रोवण्यात यश मिळाले होते. मात्र या नव्याने जिंकलेल्या भूभागामध्ये सुलेमान फार काळ राहिला नाही कारण बाबराने आपल्या या पुतण्याला बदखशांचे शासन करायला परत पाठवले आणि नंतर थोड्याच काळात बाबर मरण पावला. त्यामुळे पानिपतमध्ये मिळवलेल्या नेत्रदीपक, पण अल्पजीवी विजयानंतर जेमतेम पंधराच वर्षांनी बाबराच्या मुलांनी आपल्या पित्याचे साम्राज्य निर्माण करण्याचे स्वप्न सोडून देऊन हिंदुस्थान सोडला होता. या कुटुंबाचे हे उलटे स्थलांतर आणि सिंधू नदी ओलांडून घेतलेली लाजिरवाणी माघार पाहायला सुलेमान तिथे नव्हता.

मात्र त्यानंतरच्या पंधरा वर्षांमध्ये सुलेमानने काबूलच्या गादीकरता त्याचे चुलतभाऊ हुमायून, कामरान, अस्करी आणि हिंदल यांनी केलेले रक्तरंजित आणि त्वेषपूर्ण संघर्ष फक्त पाहिलेच नाहीत तर तो त्यांमध्ये सहभागीही झाला होता. यात तो कधी कामरानच्या बाजूने तर कधी हुमायूनच्या बाजूने राहिला. एकदा तर या पाचही तरुणांनी मोठ्या आशेने एकत्र येऊन समरकंदवर चालून जाण्याची योजनाही बनवली होती. शिवाय, लहानपणी अकबराचे आयुष्य आपले चुलते आणि आपला पिता यांच्यामधल्या स्पर्धापूर्ण समतोलामध्ये कसे वरखाली होत असे, मग पित्याच्या मृत्युनंतर त्याला गादीवर कशा प्रकारे बसवले गेले होते, त्याच्या वतीने राज्य सांभाळणारे कारभारी कसे त्याच्यावर सत्ता गाजवत असत, युद्धखोर सरदार त्याला कसे वारंवार आव्हान देत असत आणि या सगळ्यात अकबराचा निभाव लागण्याची शक्यता कशी कमी होती, हे सगळे सुलेमानला चांगले ठाऊक होते. आणि आता जेव्हा तो विजेत्या फौजेचा भाग नव्हे तर एकाकी आणि अगतिक व्यक्ती म्हणून दुसऱ्यांदा सिंधू ओलांडून आला तेव्हा त्याच्या हेही लक्षात आले की, तो आणि त्याचे चुलत भाऊ ज्या नाटकी अभिनिवेशाने सिंहासनाकरता एकमेकांशी लढाया करत होते ती गोष्ट अकबराने जे साध्य केले होते त्याच्या तुलनेत किरकोळ संगीतखुर्चीचा खेळ असल्यासारखी होती.

इ. स. १५४०च्या जुलै महिन्यात बाबरचा त्याच्यापेक्षा लहान चुलत भाऊ मिर्झा हैदर लाहोरमध्ये आला तेव्हा त्याला राहण्यासाठी जागा मिळण्याचीही मारामार झाली. तो लिहितो, ‘तिथे इतकी गर्दी झाली होती

की, रस्त्यावरून चालणे अवघड झाले होते आणि राहण्यासाठी जागा मिळणे तर त्याहूनही कठीण झाले होते.'[५] मात्र ही गर्दी काही उत्सवी गर्दी नव्हती. त्यावेळी तिथे ना कुठला राज्यारोहण सोहळा सुरू होता, ना कुठला सण आणि ना कुठली तीर्थयात्रा. उलट लाहोर शहरामध्ये एक अंधकार पसरलेला होता. रस्त्यांवर गजबज होती, पैसे देऊन राहण्याच्या सगळ्या जागा भरलेल्या होत्या आणि सगळ्या बागांमध्ये जागोजाग तंबूंची गच्च गर्दी झाली होती. या सर्वांचे एकच कारण होते की, एक राज्य मोडून पडण्याच्या बेताला आले होते आणि लाहोर ही त्याची शेवटची आशा आणि शेवटचे आश्रयस्थान होते.

त्यापूर्वी सुमारे दीड महिना आधी, दुसरा मुघल 'पादशाह'[६] हुमायून आणि महत्त्वाकांक्षी अफगाण सेनानी शेर शाह हे कनौजमध्ये गंगेच्या किनाऱ्यावर एकमेकांसमोर उभे ठाकले होते. उत्तरेतला उन्हाळा वाढत असताना त्यांच्यामध्ये लहान-लहान चकमकी घडत होत्या आणि क्वचित कुणीतरी पक्षांतर करून इकडून तिकडे जात होता.[७] हुमायूनच्या फौजेतील एका तुकडीचे नेतृत्व करत असलेल्या मिर्झा हैदरला त्याच्या सैनिकांमध्ये युद्धाबद्दलची अनुत्सुकता जाणवली होती. त्याने नंतर उपहासाने लिहिले, 'आणि त्या लोकांचं म्हणणं होतं, 'चला, घरी जाऊन आराम करू या.'

आकाशामध्ये मेघ 'माजावर आलेल्या हत्तींप्रमाणे गर्जू लागले.'[८] मुघल सैनिकांपेक्षा त्यांच्यामध्ये लढण्याची इच्छा जास्त तीव्र होती. पावसामुळे सर्वत्र चिखल झाला होता त्यामुळे कुठेही तंबू ठोकणे शक्य नव्हते. त्यामुळे लढण्याशिवाय पर्यायच उरला नाही. मुहर्रमचा दहावा दिवस किंवा अशुरा, म्हणजे फार पूर्वी करबला इथे रक्ताने न्हालेल्या रणभूमीमध्ये हुसेनने प्राणार्पण केले तो दिवस. १७ मे १५४० रोजी हाच दिवस होता. हुमायून आणि त्याच्या ४०,००० सैनिकांनी या दिवशी कनौज इथे शेर शाहच्या १५,००० च्या फौजेवर आक्रमण केले.

इथे आक्रमण हा शब्द कदाचित अयोग्य ठरेल. हैदरच्या आठवणीप्रमाणे तो आणि नदी यांच्यामध्ये सत्तावीस मुघल तुकड्या होत्या. प्रत्येक तुकडीच्या नायकाच्या हाती निशाण फडफडत होते. प्रत्यक्ष लढाईच्या दिवशी मात्र यातले एकही निशाण दिसत नव्हते. 'कारण सगळ्या महान अमीरांनी नाखुशीपायी आपापली निशाणे लपवून ठेवली होती.'

लढाईला सुरुवात होण्यापूर्वीच हरलेल्या सेनानींनी त्यांच्या अप्रशिक्षित गुलामांना रणभूमीवर पाठवले. या लोकांनी शेर शाहला समोरून येताना पाहताच घाईघाईने त्याच्या वाटेतून दूर होण्यासाठी पळापळ सुरू केली. या धांदलीत मुघल सैन्यातल्या कणमात्र शिल्लक राहिलेल्या शिस्तीचीही पार धूळदाण झाली. हैदर लिहितो, 'सगळी फौज विखुरली.' आणि एखादा तोफगोळा डागला जाण्याआधी किंवा एखादा सेनानी जखमी होण्याआधीच सगळेजण आपापले पाहू लागले. जिवाच्या आकांताने नदी गाठण्याकरता सेनानी आणि गुलाम यांच्यामध्ये जणू पळण्याची शर्यतच लागली.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## अ वॉन्टेड मॅन

**ली चाइल्ड**

अनुवाद

**सरिता आठवले**

पृष्ठे : ४३२
किंमत : ७५०

*एक खून आणि एक विलक्षण गुंतागुंत... गुन्हेगार, पोलीस आणि गुप्तहेर संघटना... तिढा वाढतच जातो ... आणि?*

तो साक्षीदार म्हणाला की, खरे तर जे घडले ते त्याने पाहिलेच नव्हते.

पण मग हे झाले कसे?

रात्री बारानंतर थोड्याच वेळाने हिरवा गरम कोट घातलेला एक माणूस काँक्रीटच्या त्या छोट्याशा शेडमध्ये गेला. त्या शेडला एकच दार होते. त्याच्या मागोमाग आणखी दोघे त्या दारातून आत शिरले. दोघांनीही काळे

सूट परिधान केले होते. थोड्या वेळाने ते दोघे बाहेर आले; पण तो हिरवा कोट घातलेला माणूस मात्र बाहेर आला नव्हता.

त्या शेडपासून साधारण तीस पावलांवर एक लालभडक गाडी उभी होती. अग्निशामक दलाच्या गाडीसारख्या लाल रंगाची गाडी, अगदी भडक. ती दोन दारांची छोटी गाडी नक्कीच नव्हती. चार किंवा पाच दारांची नवीकोरी आलिशान गाडी असावी असा त्या साक्षीदाराचा समज झाला होता. टोयोटा, होंडा, हुंडाय किंवा कियाही असू शकते.

गाडी कुठली का असेना, काळ्या सुटातील ते दोघे त्या गाडीतून निघून गेले होते.

हिरवा कोट घातलेला तिसरा माणूस अजून बाहेर आला नव्हता.

थोड्या वेळाने त्या शेडच्या दाराखालून रक्ताचा ओघळ वाहायला लागला आणि दारात रक्ताचे थारोळे साचले.

मग त्या साक्षीदाराने ९११ नंबरवर फोन केला.

थोड्याच वेळात तिथला शेरीफ आला. साक्षीदाराने त्याला सर्व घटनाक्रम सांगितला. शेरीफने सगळे ऐकून घेतले. हा शेरीफ माणसांना शांतपणे हाताळण्यात चांगलाच प्रवीण होता आणि हे त्याच्या अनेक कौशल्यांपैकी एक कौशल्य होते. साक्षीदाराच्या बोलण्यावर शेरीफने विचार केला. देशाच्या या भागात लोकवस्ती अगदी विरळ होती. मैलोन्मैल, पार क्षितिजापर्यंत, लांबच लांब मोकळे रस्ते रिबिनींसारखे पसरले होते. हे रस्त्यांचे जाळे विंचरून काढण्यासाठी शेरीफने महामार्गाच्या गस्त पथकाची मदत घ्यायचे ठरवले. शिवाय राजधानीतून हेलिकॉप्टरही मागवले. लाल इंपोर्टेड गाडी आणि त्यातून जाणारे काळ्या सुटातले दोन प्रवासी टिपण्यासाठी बुलेटिन जारी केले.

नव्वद मैल आणि नव्वद मिनिटे, एका सुमार राखाडी गाडीतून एका बाईबरोबर जॅक रीचरला प्रवास करावा लागला होता आणि मग लांबवर, महामार्गाच्या उड्डाणपुलावरील पूर्व-पश्चिम दिशा दर्शवणारे चमचमते, हिरवे दिवे दिसायला लागले. बाईंनी गाडी थांबवली. जॅक गाडीतून उतरला. बाईंना धन्यवाद दिले आणि त्यांचा निरोप घेतला. बाई डेन्व्हर आणि सॉल्ट लेक सिटीकडे पश्चिमेला जाणाऱ्या रस्त्याला वळल्या आणि जॅक उड्डाणपुलांच्या खालच्या रस्त्यावर आला. पूर्वेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला उभे राहून,

चेहऱ्यावर  बळेच हसू आणत त्याने लिफ्ट मागण्यासाठी अंगठा उंचावला.

पण लिफ्ट मिळणे सोपे नव्हते.

सहा फूट पाच इंच उंचीचा जॅक अंगापिंडाने धिप्पाड होता आणि त्या रात्रीही तो नेहमीसारखाच जरासा गबाळा दिसत होता. महामार्गावरच्या एकेकट्या ड्रायव्हर्सना अशी बेभरवशाची वाटणारी सोबत नकोशी वाटते हे रीचरला चांगलेच माहीत होते आणि तो नेमका तसाच दिसतो याची त्याला जाणीव होती; त्यामुळे कोणताही ड्रायव्हर त्याला आनंदाने लिफ्ट द्यायला तयार झाला नसता. परिस्थिती अगदीच निराशाजनक होती आणि त्यात त्याच्या नाकाला नुकत्याच झालेल्या जखमेची भर पडली होती. त्या जखमेवर त्याने चंदेरी चिकटपट्टी लावली होती. रस्त्यावरच्या पिवळट प्रकाशात ती नक्की चमकत असणार; त्यामुळे तो आणखी कसातरी दिसत असला पाहिजे. याविषयी त्याची खात्रीच होती. औषध म्हणून जॅकला ती चिकटपट्टी बरी वाटत होती म्हणून अजून तासभर तरी तो ती काढणार नव्हता. या तासाभरात त्याला लिफ्ट मिळाली नसती तर मात्र त्याने ती काढायचा विचार केला असता.

आणि त्या एका तासात त्याला लिफ्ट मिळालीच नाही.

नेब्रास्काच्या थंडीत रात्रीच्या वेळी रहदारी अगदीच तुरळक होती. तो ज्या उड्डाणपुलाच्या जाळ्याखाली उभा होता तसा चौक आजूबाजूच्या रस्त्यांवर मैलोन्मैल नव्हताच. वरच्या पुलावर थोडीशी रहदारी होती; पण इतर रस्त्यांवरून पूर्वेकडे जाण्यासाठी त्या रस्त्याला लागणारी वाहने फारच थोडी होती. पहिल्या तासात फक्त चाळीस वाहने त्या रस्त्याकडे वळली. त्यातही कितीतरी प्रकार - गाड्या, ट्रक, वेगवेगळ्या कंपन्यांच्या आलिशान मोटारी, त्यांचे वेगवेगळे नमुने, वेगवेगळे रंग. त्या चाळीस वाहनांपैकी तीस वाहनांनी तर त्याच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. दहा ड्रायव्हर्सनी वेग कमी करण्याचे सौजन्य दाखवले; पण त्याचा एकूण अवतार पाहून मान वळवून निघून गेले.

यात जगावेगळे काहीच नव्हते. दिवसेंदिवस महामार्गावर लिफ्ट मागून प्रवास करणे कठीण होत होते.

पण आता लवकर लिफ्ट मिळवणे भागच होते.

जॅक रस्त्याच्या अगदी कडेला आला. त्याने नाकावरची पट्टी गालाच्या बाजूने अर्धा इंच सैल केली. ते चिकटपट्टीचे छोटेसे टोक त्याने चिमटीत पकडले.

आता ही पट्टी झट्कन ओढून काढायची की हळुवार हाताने सोडवायची या द्विधा मनःस्थितीत तो होता. यात खरे तर पर्याय असा नव्हताच. पट्टी कशीही काढली तरी वेदना होणारच होत्या. त्याने मन घट्ट केले. चिकटपट्टी खेचून काढली. गालाला फारशा वेदना झाल्या नाहीत; पण नाकाचे रामायणच झाले. नाकाची ती ताजी जखम आणखी उकलली. नाकाचा सुजलेला भाग झटक्यात वर उचलला गेला आणि वेगाने वर जाऊन दाणकन खाली आपटला. वेदनेची जोरदार सणक उठली.

त्या मानाने दुसरा गाल बरा होता.

जॅकने त्या काढलेल्या चिकटपट्टीची सुरळी केली आणि ती खिशात ढकलली. हात जिभेने ओला करून चेहऱ्यावरून फिरवला.

तेवढ्यात त्याने दूरवर हेलिकॉप्टरचा आवाज ऐकला. हेलिकॉप्टरचा सर्च लाइट अंधाराला चिरत त्याच्या दिशेने येत होता. खालच्या रस्त्यावर आपले सावज शोधत होता. जॅक वळला आणि त्याने पुन्हा अंगठा उंचावून लिफ्ट मागण्यासाठी पवित्रा घेतला. वर हेलिकॉप्टर थोडावेळ रेंगाळले. काही हाती लागत नसल्याचे पाहून पश्चिमेला निघून गेले. त्याचा आवाज कमी कमी होत विरून गेला.

शहरातून बाहेर जाणारी रहदारी विरळच होती. येणारी वाहने हळूहळू कमी होत होती आणि आली तरी महामार्गाला वळत होती. एकही वाहन सरळ पुढे जात नव्हते. याही परिस्थितीत जॅक हताश झाला नाही.

रात्र झाली होती. गारठा वाढत होता. अर्थात त्यामुळे जॅकला थोडासा दिलासा मिळाला. गारठ्याने जॅकचा चेहरा बधिर झाला; त्यामुळे नाकाचे दुखणे जरा कमी झाल्यासारखे वाटत होते.

थोड्याच वेळात कॅन्ससची नंबर प्लेट लावलेला एक ट्रक दक्षिणेकडून आला आणि वेग कमी करून पूर्वेला वळला. ट्रकच्या काळ्या, उंचेल्या ड्रायव्हरने जाडजूड कोट घातला होता. बहुधा त्याच्या ट्रकचा हिटर निकामी झाला असावा. ड्रायव्हरने जॅककडे रोखून पाहिले. तो थांबतोय असे वाटेपर्यंत त्याने नजर फिरवली आणि तो निघून गेला.

रीचरकडे प्रवासासाठी पैसे होते. लिंकन किंवा ओमाहाला गेल्यानंतर पुढे जायला तिथून बस मिळाली असती; पण त्या शहरांपर्यंत जाण्यासाठी तर लिफ्ट मिळायला हवी! समोरून येणारी गाडी त्याला दाद न देता पुढे निघून

गेली की दुसरी गाडी दिसेपर्यंत दोन्ही बगलेत हात खुपसून, अधूनमधून दाणदाण पाय आपटून तो गारठ्यावर मात करायचा प्रयत्न करत होता.

मग एकदा महामार्गावर गस्त घालणारी पोलिसांची मोठमोठ्या दिव्यांची गाडी त्याच्या समोरून भरधाव निघून गेली. गाडीचा सायरन बंद होता. गाडीत दोन पोलीस होते. त्यांचे फक्त समोर, रस्त्याकडे लक्ष होते. त्यांना जॅक दिसलाच नाही. कदाचित दखल घेण्याजोगे काहीतरी पुढे कुठेतरी असावे.

त्यानंतर काही वेळाने आलेल्या गाड्यांपैकी दोन गाड्या थांबतील असे जॅकला वाटले; पण एक दक्षिणेला तर दुसरी उत्तरेला निघून गेली. दोन्ही गाड्या थोड्या रेंगाळल्या, जवळजवळ थांबल्याच. त्यांच्या ड्रायव्हर्सनी जॅकचा अंदाज घेतला आणि लगेच ते वेग वाढवून निघून गेले.

त्यांचे ते रेंगाळणे, थांबणे पाहून जॅकची लिफ्ट मिळण्याची आशा बळावली. दिवसाउजेडी कुणाला लिफ्ट न देणारे बहुधा अपरात्री, उशिराचा विचार करून लिफ्ट द्यायला तयार होत असावेत. रात्री प्रवास करणे हीच एक विशेष बाब होती. त्या मानाने एखाद्या अनोळखी माणसाला लिफ्ट देणे तसे किरकोळच होते.

अशा विचारांनी जॅकची आशा पालवत होती.

आणखी एक ड्रायव्हर, आणखी एक शोधक कटाक्ष; पण शेवटी गाडी निघून गेली.

आणखी एक–

जॅकने हात ओला केला. केसावरून फिरवला. केस नीट बसवायचा प्रयत्न केला. चेहऱ्यावर ओढूनताणून हसू आणले. 'लिफ्ट मिळेलच' असे त्याने स्वतःलाच बजावले.

आणि त्र्याण्णव मिनिटांच्या प्रतीक्षेनंतर सरतेशेवटी त्या रस्त्यावर त्याच्यासाठी एक गाडी थांबली.

◆

## १६ जुलै ते १५ ऑगस्ट २०२६ दरम्यानचे दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ जुलै दरम्यान खास सवलत**

**१६ जुलै - जॅकलिन गोल्ड यांचा जन्मदिन**

‘अ वुमन्स करेज’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४०/-**

---

**१७ जुलै - अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांचा जन्मदिन**

‘द केस ऑफ द केअरलेस क्यूपिड’, ‘द केस ऑफ द काउंटरफिट आय’, ‘द केस ऑफ द क्रिमसन किस’, ‘द केस ऑफ द क्रुकेड कँडल’, ‘द केस ऑफ द डेडली टॉय’, ‘द केस ऑफ द डेम्यूर डिफेन्डन्ट’, ‘द केस ऑफ द हॉन्टेड हसबन्ड’, ‘द केस ऑफ द हाऊलिंग डॉग’, ‘द केस ऑफ द आइस-कोल्ड हॅन्ड्स’, ‘द केस ऑफ द लकी लूझर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०९०/- । सवलत किंमत १४४९/-**

---

**१८ जुलै - लॉरेन स्क्रग्ज यांचा जन्मदिन**

‘एक लढा असाही…’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

---

**१९ जुलै - सूर्यकांत जाधव यांचा जन्मदिन**

‘आघात’, ‘अस्मिता’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**१९ जुलै - स्नेहलता जोशी यांचा जन्मदिन**

‘अजून नाही जागी राधा’, ‘द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट’, ‘दडलेला इतिहास’, ‘दलाल स्ट्रीट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५७५/- । सवलत किंमत ९६९/-**

---

**२० जुलै - डॅनियन ब्रिंकली यांचा जन्मदिन**

‘सीक्रेट्स ऑफ द लाइट’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १४०/-**

---

**२० जुलै - पोलेत बूर्ज्वा यांचा जन्मदिन**

‘फ्रँकलिन मालिका (१४ पुस्तके)’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८००/- । सवलत किंमत ५६७/-**

**२१ जुलै - माधवी देसाई यांचा जन्मदिन**
‘असं म्हणू नकोस’, ‘धुमारे’, ‘हरवलेल्या वाटा’, ‘कांचनगंगा’, ‘कथा सावलीची’, ‘किनारा’, ‘मंजिरी’, ‘नियती’, ‘प्रार्थना’, ‘सागर’, ‘शुक्रचांदणी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १६७०/- । सवलत किंमत ११९९/-**

**२१ जुलै - अर्नेस्ट हेमिंग्वे यांचा जन्मदिन**
‘घणघणतो घंटानाद’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३६९/-**

**२१ जुलै - मायकेल कॉनेली यांचा जन्मदिन**
‘सिटी ऑफ बोन्स’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २२९/-**

**२२ जुलै - धनंजय बिजले यांचा जन्मदिन**
‘लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा’, ‘अण्णा हजारे : भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-**

**२३ जुलै - जीतेंद्र दीक्षित यांचा जन्मदिन**
‘३५ दिवस : २०१९ने दिली महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी’, ‘महाराष्ट्रातील महाबंड’, ‘लाल बर्फाचे खोरे’, ‘मुंबई आफ्टर अयोध्या’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १४७०/- । सवलत किंमत ९५६/-**

**२५ जुलै - स. शं. देसाई यांचा जन्मदिन**
‘अखेरची लढाई’, ‘महापर्व’, ‘पहिले जागतिक महायुद्ध’, ‘दुसरे जागतिक महायुद्ध’, ‘चंबळेच्या पलीकडे’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत ११६३/-**

**२८ जुलै - कॅरोल हिगिन्स क्लार्क यांचा जन्मदिन**
‘झॅप्ड’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत १०९/-**

**२९ जुलै - तिमिरी एन. मुरारी यांचा जन्मदिन**
‘द तालिबान क्रिकेट क्लब’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९२/-**

---

**२९ जुलै - करेन रोझ यांचा जन्मदिन**
‘स्क्रीम फॉर मी’, ‘डाय फॉर मी’, ‘आय कॅन सी यू’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १९७५/- । सवलत किंमत १११६/-**

---

**२९ जुलै - प्रभाकर परांजपे यांचा जन्मदिन**
‘काळोखाचे थेंब’, ‘पत्रकारितेची मूलतत्त्वे’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत २१४/-**

---

**२९ जुलै - जे.आर.डी. टाटा यांचा जन्मदिन**
‘जेआरडी टाटा यांची पत्रं’, ‘कीनोट : जे.आर.डी. टाटा’, ‘टाटा – एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती’, ‘जेआरडी : एक चतुरस्र माणूस’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२३०/- । सवलत किंमत ८००/-**

---

**३० जुलै - नरेन्द्र मोहन यांचा जन्मदिन**
‘कमबख्त निंदर’, ‘क्या हाल सुनावा’ या पुस्तकावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ४२०/-**

---

**३० जुलै - डॉमिनिक लॅपिए यांचा जन्मदिन**
‘फ्रीडम अ‍ॅट मिडनाइट’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१५/-**

---

**खालील संचांवर १ ते १५ ऑगस्ट दरम्यान खास सवलत**

**१ ऑगस्ट - हर्मन मेलव्हिल यांचा जन्मदिन**
‘शिस्तीचा बळी’, ‘पाचूचे बेट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २३१/-**

---

**१ ऑगस्ट - रॉबर्ट जेम्स वॉलर यांचा जन्मदिन**
‘अद्वैत’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २१९/-**

**२ ऑगस्ट - दिपा महानवर यांचा जन्मदिन**

‘विमुक्ती’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**२ ऑगस्ट - कॅरोल ओ’कॉनर यांचा जन्मदिन**

‘यशस्वी नेतृत्व’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ११९/-**

**३ ऑगस्ट - लिऑन युरिस यांचा जन्मदिन**

‘एक्झोडस’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ३३९/-**

**४ ऑगस्ट - जागतिक मैत्रिदिन**

‘चौघीजणी’, ‘मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा’, ‘फाईव्ह पॉइंट समवन’, ‘द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ’, ‘एक होता मित्र’, ‘दोस्त’, ‘अदान ॲण्ड ईव्हा’, ‘मैत्री अशी आणि तशी...’, ‘बेधुंद’, ‘केवळ मैत्रीसाठी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २७००/- । सवलत किंमत १७१५/-**

**४ ऑगस्ट - राजीव तांबे यांचा जन्मदिन**

‘बब्बड मालिका भाग १’, ‘बंटूचा टिक टिक मित्र’, ‘ससोब-हसोबा मालिका भाग १’, ‘ससोबा-हसोबा मालिका भाग २’, ‘अजब डोंगर आणि इतर कथा’, ‘राजाचा घोडा आणि इतर कथा’, ‘फुले फुलली आणि इतर कथा’, ‘चकाचक चंपू’, ‘उडणारी मगरूली’, ‘पुस्तक वाचणारे फुलपाखरू’, ‘सू-सू अंतराळवीर आणि फुलपाखरू’, ‘रंगीत घोटाळा आणि छोटे जवान’ या सर्व संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २८२०/- । सवलत किंमत १९७४/-**

**४ ऑगस्ट - लीना दामले यांचा जन्मदिन**

‘अंतरिक्षाच्या अंतरंगात’, ‘कथारूपी खगोलशास्त्र’, ‘अशक्य भौतिकी’, ‘नाते ब्रह्मांडाचे’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ८१३/-**

**४ ऑगस्ट - रिचर्ड प्रेस्टन यांचा जन्मदिन**

‘मायक्रो’, ‘द डेमन इन द फ्रीजर’, ‘द हॉट झोन’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९७०/- । सवलत किंमत ५८२/-**

**५ ऑगस्ट - डेव्हिड बॉल्डाची यांचा जन्मदिन**

'द सिम्पल ट्रूथ', 'सेव्हिंग फेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ४६९/-**

**५ ऑगस्ट - टॉड बर्पो यांचा जन्मदिन**

'स्वर्गाचा साक्षात्कार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**६ ऑगस्ट - हिरोशिमा / परमाणू दिन**

'वॉर्सा ते हिरोशिमा', 'नागासाकी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२९५/- । सवलत किंमत ८१७/-**

**७ ऑगस्ट - ग्रेग चॅपल यांचा जन्मदिन**

'फिट फॉर ५०+ फॉर मेन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ९६/-**

**८ ऑगस्ट - सारा ड्युनांट यांचा जन्मदिन**

'सेक्रेड हार्ट्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१४/-**

**८ ऑगस्ट - शंकर पाटील यांचा जन्मदिन**

'आभाळ', 'बंधारा', 'भेटीगाठी', 'धिंड', 'गारवेल', 'घालमेल', 'इल्लम', 'जुगलबंदी', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'खुळ्याची चावडी', 'खुशखरेदी', 'लवंगी मिरची कोल्हापूरची', 'पाटलांची चंची', 'पाऊलवाटा', 'फक्कड गोष्टी', 'शापित वास्तू', 'श्रीगणेशा', 'ताजमहालमध्ये सरपंच', 'टारफुला', 'वळीव', 'वावरी शेंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३८००/- । सवलत किंमत २६६०/-**

**१० ऑगस्ट - फुलनदेवी यांचा जन्मदिन**

'मी फुलनदेवी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २६९/-**

**११ ऑगस्ट - वि. स. वाळिंबे यांचा जन्मदिन**

'नेताजी', 'वॉर्सा ते हिरोशिमा', 'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल' या पुस्तकांच्या

संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२९०/- । सवलत किंमत १४४३/-**

**१३ ऑगस्ट - आचार्य अत्रे यांचा जन्मदिन**

‘आचार्य अत्रे बारा गावचं पाणी’, ‘काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २६९/-**

**१५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन**

**संच १ -**‘भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया’, ‘फ्रीडम ॲट मिडनाइट’, ‘मोहनदास’, ‘परमवीरचक्र’ ‘सैनिक हो तुमच्यासाठी’, ‘अथक’, ‘क्रांतिफुले’, ‘भारतीय सैनिक’, ‘ऑपरेशन सिंदूर’, ‘नेताजी’, ‘नेताजी सुभाषचंद्र बोस’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४६५/- । सवलत किंमत २५९९/-**

**संच२ -**‘अ कॉल टू ऑनर’, ‘जिना : हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य’, ‘जालियनवाला बाग’, ‘१९४६ स्वातंत्र्याचे अंतिम युद्ध’, ‘द अदर साईड ऑफ सायलेन्स’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३५७५/- । सवलत किंमत २६८१**

◆

**- किमतींमध्ये बदलाची शक्यता -**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / Whats App No. **९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**

author@mehtapublishinghouse.com

# मेहता पब्लिशिंग हाऊस आयोजित प्रकाशन समारंभ




## हाटूमुटूचा चंद्र

















## क्षमा

RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Round Garden, Vijayanagar Colony, Sadashiv Peth, Pune - 411030.
Publication Date : 11/07/2026 Posting Date : 11/07/2026

## आवर्जून वाचावं...
















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________